म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९९३
१५६६

के. एन. राज

# भारताची आर्थिक प्रगती

आजवरची कामगिरी आणि भविष्यातील वाटचाल

REFBK-0015137

समाज प्रबोधन संस्था

नालंदा कॉलेज, बिहार शरीफ, पाटणा येथे २३ व २४ जानेवारी १९६५ या दिवशी दिलेली व्याख्याने

# भारताची आर्थिक उन्नति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७४३८८ वि: निबंध
क्रमांक १९९३ नों: दि: ११/३/६७

के. एन्. राज
मोनेटरी अर्थशास्त्राचे प्राध्यापक,
दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली युनिव्हर्सिटी

REFBK-0015137

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

७४९३८

समाज प्रबोधन संस्था

समाज प्रबोधन संस्था, पुणे

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य
साहित्य व संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

संपादन : पन्नालाल सुराणा
मुखपृष्ठ : बाळ ठाकूर

**किंमत : एक रुपया वीस पैसे**

© के. एन्. राज, १९६५

प्रथमावृत्ती जून १९६६

**प्रकाशक :** श्री. शंकरराव देव, अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था, ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे २. **मुद्रक :** श्री. मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि. ३८३ नारायण, पुणे २.

# डॉ. के. एन्. राज

डॉ. के. एन्. राज यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लंडन, येथून डॉक्टरेटची पदवी संपादन केली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या संशोधन व सांख्यियिकी विभागात काही काळ काम केल्यानंतर ते प्लॅनिंग कमिशनमध्ये काम करू लागले. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा खर्डा तयार करण्यात डॉ. राज यांचा मोठा वाटा आहे. प्लॅनिंग कमिशन सोडल्यापासून दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली, येथे मॉनेटरी इकॉनॉमिक्स या विषयाचे प्राध्यापक म्हणून ते काम करीत आहेत. तीन वर्षे त्यांनी या संस्थेचे संचालकपदही विभूषित केलेले आहे.

रिझर्व्ह बँकेच्या वित्तीय धोरणावरील त्यांचा ग्रंथ (१९४८) आणि बँक ऑफ ईजिप्तच्या अन्वये दिलेल्या व्याख्यानमालेद्वारा बेकारीच्या अर्थशास्त्रीय कल्पनेची त्यांनी केलेली चिकित्सा प्रसिद्ध आहेत.

आर्थिक विश्लेपणाचा उपयोग मार्गदर्शक आर्थिक धोरण आखून देण्यासाठी करण्याची पात्रता असलेल्या मोजक्याच अर्थशास्त्रज्ञांमध्ये डॉ. राज यांची गणना होते. एक अत्यंत यशस्वी व विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून डॉ. राज यांचा लौकिक आहे. आर्थिक धोरणे निश्चित करणाऱ्या अनेक समित्यांवर डॉ. राज यांनी आजवर काम केलेले आहे.

# आभार

डॉ. के. एन्. राज यांनी आपल्या व्याख्यानांचे भाषांतर प्रकाशित करण्यास मोठ्या आनंदाने परवानगी दिली. श्री. गोस्वामी व श्री. साठे यांनी डॉ. राज यांच्या व्याख्यानांचे भाषांतर करून दिले, आणि डॉ. क्षितिमोहन मुखर्जी यांनी पुस्तकाला पुरस्कार लिहून दिला, यासाठी आम्ही या सर्वांचे आभारी आहोत.

प्रकाशक

# पुरस्कार

आर्थिक विकासाच्या क्षेत्रात भारताने आजवर पार पाडलेल्या कामगिरीचे चित्रण घडवून डॉ. के. एन्. राज यांनी एक मूल्यवान सेवा बजावली आहे. आज भारताच्या आर्थिक वाढीविषयी कित्येकांनी आशा सोडल्यासारखी आहे. अशा वेळी आपल्या भूतकाळाची उजळ बाजू लोकांच्या दृष्टिपथात ते आणीत आहेत या गोष्टीला विशेष मूल्य आहे. अनेकांनी हाय का खाल्ली त्याची कारणमीमांसा करण्याचाही प्रयत्न डॉ. राज यांनी केला आहे आणि त्याचेही वेगळे महत्त्व आहे. आजच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण ज्या प्रकारे केले जाते, आणि ज्यामुळे लोकांना भारताच्या आर्थिक अभ्युदयाची खात्री उरलेली नाही व त्यांचा धीर खचला आहे, त्या विश्लेषणावरील डॉ. राज यांचा निवाडा सर्वस्वी वस्तुनिष्ठ आहे. डॉ. राज यांच्या नालंदा व्याख्यानांचे भाषांतर प्रसिद्ध करण्याचा निर्णय समाज प्रबोधन संस्थेने घेतला, कारण आज अशा अधिकारी, वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून आपल्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

लष्करी आणि आर्थिक, अशा दोन्ही दृष्टींनी चीन भारताला देत असलेल्या आव्हानाविषयी भारत अतिरंजित कल्पना करून बसलेला आढळतो ही गोष्ट आवर्जून सांगितली जाणे महत्त्वाचे आहे. दुसऱ्या बाजूला, आजपर्यंत आर्थिक क्षेत्रात आपण जी उन्नती साधली आहे तिच्या, भविष्याच्या वाटचालीच्या दृष्टीने काय अर्थ व संभाव्यता आहेत त्याची जास्तीत जास्त लोकांना स्पष्ट कल्पना करून देणेही आवश्यक आहे. भारत व पाकिस्तान यांच्यामधील १९६५ च्या सप्टेंबरमधील युद्ध व अन्नधान्याचे आजचे दुर्भिक्ष (ज्याविषयी सार्वत्रिक एकमत आढळते) या दोन्ही घटनांमुळे पुढील मार्ग आक्रमीत असता पाळावयाच्या शिस्तीची व पथ्याची कल्पना लोकांना असावी याचे महत्त्व अधिकच वाढलेले आहे. या संदर्भात, चिनी समाजाची श्रेष्ठ दर्जाची एकात्मता व शिस्त या गोष्टींची या देशात पुरेशी दखल घेतली जात नाही ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

डॉ. राज यांनी देखील भारताच्या आर्थिक कामगिरीचे मोजमाप 'जरा उणेच केले असावे असे म्हणण्यास जागा आहे. राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीच्या सरकारी आकडेवारीत प्रत्यक्षात साध्य केलेल्या वाढीच्या दरापेक्षा कमी दर हिशेबात घेतला गेला आहे. अशी शक्यता असण्याची दोन

मुख्य कारणे आहेत. उत्पन्न पद्धती * या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीनें अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या विभागांच्या उत्पन्नाविषयीचे केलेले अंदाज प्रत्यक्षापेक्षा उणे (under–estimation) असतात. किमान पक्षी, स्थिर किंमती घेऊन केलेले अंदाज उणे असतात, असे उघड दिसते. मोठ्या उद्योगधंद्यांचा विभाग घेतला तरी निर्देशांकांचा उपयोग आज अशा रीतीने केला जातो की आज मंद गतीने वाढ होत असलेल्या उद्योगधंद्यांना जलद गतीने विस्तार पावत गेलेल्या उद्योगधंद्यांपेक्षा अधिक वजन दिले जाते. उत्पन्नाच्या एकूण अंदाजापैकी ४२ टक्क्यांइतक्या अधिक भागावर या प्रकारच्या उण्या अंदाजाचा आघात पोचतो. पंचवार्षिक योजनांच्या कालखंडातील वाढीचा वेग सर्व वर्षांतील वाढ लक्षात घेऊन व सरळ रेषेत (linear) मोजला तर ३.५९ टक्के येतो. जर अंदाज बऱ्याच अंशाने वीस व तीस टक्क्यांनी उणा असेल, आणि एवढ्या प्रमाणात तो कमी असण्याची शक्यता आहे, तर वाढीचा दर वर्षाला ०.५ ते १·० टक्क्याने प्रत्यक्ष अधिक असू शकेल. म्हणजे खरा वाढीचा दर ४.० ते ४·५० टक्के असू शकेल.

वरील माहिती बरोबर असेल तर, भारताच्या आर्थिक स्थितीविषयी घाबरून हाय खाण्याचे कारण नाही इतकेच नाही, तर आपल्या पंचवार्षिक योजना ज्या आर्थिक व तांत्रिक विश्लेषणावर व आडाख्यांवर आधारलेल्या आहेत त्या मागील मूलभूत तार्किक संगतीला बळकटी येते. भारतीय नियोजनाच्या दूरगामी, पूर्ण रूपांकनांत (design) प्रारंभीच्या काळात वाढ धीम्या गतीने व्हावी अशीच बुद्ध्या आखणी केलेली आहे या गोष्टीकडे लक्ष वेधणे आवश्यक व महत्त्वाचे आहे. जसजसा काळ लोटत जाईल तसतसा वाढीचा वेग वाढत जाण्याची कल्पना आहे. इतर राष्ट्रांच्या राष्ट्रीय उत्पन्नाशी व त्यांच्या वाढीच्या दराशी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाची व वाढीच्या दराची तुलना करताना ही बुद्ध्या केलेली आखणी डोळ्यांसमोर ठेवणे महत्त्वाचे आहे.

इतके स्पष्टीकरण केल्यानंतर, तोल सांभाळण्याच्या दृष्टीने, एक पुस्तीही जोडणे आवश्यक आहे. आजवरची आपली प्रगती निराशाजनक नाही याचा अर्थ आत्मसंतुष्टतेला इथे जागा आहे असा मुळीच नाही. आपल्या

---

* फुटकर व्यापार, लघुउद्योग, घरगुती सेवा इत्यादी काही विभागांचे राष्ट्रीय उत्पन्न त्या विभागात कामे करणाऱ्या व्यक्तींची संख्या व त्या त्या क्षेत्रातील दरडोई उत्पन्नाचा काही मर्यादित अभ्यासांवरून काढलेला आकडा यांच्या गुणाकाराने आज ठरविले जाते. या पद्धतीस ‘ उत्पन्न पद्धती ’ असे म्हटले जाते. त्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या व दरडोई उत्पन्नाचा आकडा— या दोन्ही गोष्टींची माहितीही अचूक व अद्ययावत् उपलब्ध नसल्यामुळे या विभागांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या अंदाजात न्यूनमितीचा ( under estimation ) दोष निर्माण होतो.

कामगिरीवर भर दिल्यामुळे डॉ. राज यांचे प्रतिपादन आत्मसंतुष्ट वृत्तीला जन्म देईल अशी शक्यता आहे. डॉ. राज यांनी आपल्या मार्गातील अडचणी झाकून ठेवल्या आहेत अशातला भाग नाही. वस्तुतः त्यांनी काही अडचणीं-कडे लक्ष वेधले आहे. पण या अडचणी त्यांनी तांत्रिक अर्थशास्त्रीय परिभाषेत मांडल्या आहेत, तर बाकीचे विवेचन सर्वसामान्य वाचकाला समजेल अशा भाषेत आहे. आणि म्हणून, आपण खूपच मजल मारली आहे, जरा आरामात घ्यायला हरकत नाही, अशी वाचकांची समज होण्याचा धोका आहे. असा समज होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

आर्थिक वाटचालीत आज ज्या एका अडचणीच्या जागी भारत येऊन पोचला आहे त्या जागेची चढण बिकट आहे याचे भान होणे महत्त्वाचे आहे. यापैकी सर्वांत दुर्लंघ्य अडचण परदेशी चलनाची आहे.* या बाबतीत सहाय्य व कर्ज रूपानेच परकीय चलन मांडवली स्वरूपात देशात येऊ शकते अशी एकंदर अर्थव्यवहारात जागतिक परिस्थिती आहे. याबद्दल उद्विग्न होणे विशेष उपयोगाचे नाही. क्षुल्लक बाबींमध्येही परदेशी कच्चा वा अंशतः प्रक्रिया केलेला माल वापरण्याची प्रवृत्ती बदलून त्या जागी स्वदेशी मालाचा वापर करू लागण्याची सवय तर आपण वाढविलेली नाहीच, पण अनेक उद्योगधंद्यांत यंत्रसामुग्रीच्या व इतर स्वरूपात अशी पुष्कळ गुंतवणूक आजच करून ठेवली आहे की अंशतः प्रक्रिया केलेल्या वस्तूंची परदेशातून सतत आयात करीत राहिल्याशिवाय तिचा पूर्ण उपयोग करून उत्पादन कमाल करता येणार नाही. समजूत मात्र, परदेशी येण्या-देण्यातली घट ही उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात आवश्यक स्वरूपाची मूलभूत औद्योगिक वस्तु निर्मितिक्षमता उभी करण्याच्या कार्यक्रमांचा परिणाम होय, अशी करून घेतलेली आहे. पंचवार्षिक योजनांच्या प्रारंभी समाजातील वेगवेगळ्या गटांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कायम राहावा आणि पर्यायाने वस्तूंच्या सापेक्ष किंमती स्थिर राहाव्यात ही एक यशस्वी नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट होती. पण या कालखंडात गटांचे उत्पन्नातील हिस्से बदलले; त्यामुळे वेगवेगळ्या वस्तूंना असलेली मागणी कमी अधिक होऊन सापेक्ष किंमती स्थिर राहिल्या नाहीत. त्यामुळे, पुन्हा, उपलब्ध साधन संपत्ती आणि नियोजित खर्च यांची जी जुळणी अपेक्षित होती तिची घडी विस्कटली. उत्पन्नाचे वाटप बदलल्याने अन्नधान्याच्या बाबतीत मागणीचा आकृतीबंध बदलला आहे. त्यामुळे, वजनाच्या हिशेबाने

* या प्रस्तावनेच्या लेखनानंतर आज परकीय चलनाची टंचाई दूर करण्याच्या उद्देशाने रुपयाचे अवमूल्यन करण्याचा जालीम उपाय योजण्यात आला आहे.

अन्नधान्य पुरेसे असूनही, अन्नधान्य वाटपाची यंत्रणा आमूलाग्र बदलल्याशिवाय नव्या तऱ्हेची मागणी पूर्ण करणे शक्य दिसत नाही. लोकसंख्येची वाढ वर्षाला सुमारे २·२ टक्क्यांनी होत आहे. आणि त्यामुळे फारशी उसंत मिळत नाही. विशेषतः अन्नधान्याच्या बाबतीत हे लक्षात घेतले पाहिजे. एकंदर अडचणीच्या परिस्थितीचा परिणाम शासनाची पकड ढिली होण्यात आणि सरकारचा व जनतेचा नियोजनबद्ध विकासावरीलच विश्वास उडण्यात झाला आहे. देशाच्या दृष्टीने या दोन्ही घटना फार धोक्याच्या आहेत हे उघड आहे.

या कारणास्तव आजच्या परिस्थितीत चैनबाजी आणि उधळपट्टी यांना त्वरित आळा घातला पाहिजे; बचतीचा सरासरी व सीमांत दर वाढविला पाहिजे; करांचा जादा बोजा सहन करून उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. किंबहुना अंदाजपत्रकात खर्चापेक्षा उत्पन्न अधिक ठेवले पहिजे. हे करीत असतानाच भांडवल गुंतवणुकीतून कमाल फळ मिळेल यासाठी कार्यक्षमता वाढविण्याचे खास प्रयत्न झाले पाहिजेत आणि राज्ययंत्रणेचा कारभार सुधारला पाहिजे. या सर्वांहून मूलभूत आवश्यकता, अर्थव्यवस्थेचे सार्वजनिक नियंत्रण हितावह व जरुरीचे आहे याविषयी जनतेने व सरकारने दृढ श्रद्धा बाळगली पाहिजे. समाजातील काही घटना–परिस्थितीचे चित्र जसे 'दिसते,' तसेच ते त्याच्या सर्वांगीण व साकलिक स्वरूपात असत नाही या सत्याची आठवण समाजाने सतत बागविली पाहिजे. तेव्हा, मधून मधून बसणाऱ्या भावनांच्या हेलकाव्यांनी डगमगून न जाता परिस्थितीचे वस्तुनिष्ठ ज्ञान करून घेण्याच्या आपल्या अंगीच्या शक्तीचा वापर करून मार्ग काढण्याची शिस्त जर समाजाने अंगी बाणविली नाही तर, भूतकाळात गौरवास्पद कामगिरी करूनही, भविष्यकालची चढण पार करता येणार नाही.

क्षितिमोहन मुखर्जी

ठाणे
दा. नों. ९५७३४

व्याख्यान पहिले

# वर्तमानकालीन पेचप्रसंग आणि शेती

सर्व आत्मविश्वासच जणू नष्ट झाला आहे अशा अत्यंत बिकट मनोवस्थेत आज भारत सापडला आहे. शासनाचा कारभार आणि अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय समस्यांकडे पाहण्याचा सर्वसामान्य जनतेचा दृष्टिकोन या दोन्ही गोष्टीत ही परिस्थिती प्रतिबिंबित होते आहे. आत्मविश्वास ढळण्याला परिस्थितीत खरीखुरी तशी कारणे आहेत हे खरे; परंतु मनोधैर्यच खचले असल्यामुळे परिस्थिती आहे त्यापेक्षाही अधिक गंभीर बनली आहे. अशा स्थितीत पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे आपल्या राष्ट्रापुढील समस्यांचे स्वरूप व त्या समस्यांची विविध अंगे समजून घेणे हे होय. मनोधैर्याचा ऱ्हास हा, प्रत्यक्ष समस्यांपेक्षाही, त्या समस्यांचे स्वरूप स्पष्ट समजून न घेतल्यामुळेच उद्‌भवलेला असतो.

राष्ट्रीय समस्यांबद्दल धोरण ठरविताना आजकाल ‘ व्यवहारवादी ’ भूमिकेवरच अधिक भर दिला जातो. व्यवहारवादी भूमिका याचा अर्थ जर लवचीक व वस्तुनिष्ठ दृष्टिकोन असा असेल तर त्याबद्दल भांडत बसण्याचे काही कारण नाही. पण व्यवहारवाद हा समस्येवरील उपाय नसून समस्या सोडविण्याची ती एक पद्धती आहे. आणि म्हणूनच कुठल्याही परिस्थितीवर उपाययोजना करण्यापूर्वी परिस्थितीचे जे बौद्धिक आकलन व्हावयास पाहिजे त्याची जागा व्यवहारवाद कधीही घेऊ शकत नाही. अशा बौद्धिक आकलनावर आधारलेल्या धोरणांमुळेच राष्ट्रीय प्रयत्नांना काही उद्देश आणि दिशा प्राप्त होते. व्यवहारवादी भूमिका फार तर अशी धोरणे पार पाडण्यासाठी मार्ग व साधने उपलब्ध करून देण्यास मदत करते.

आज भारताला भेडसावणारे जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांना आर्थिक आणि राजकीय अशा दोन्ही बाजू आहेत; आणि ते प्रश्न त्या दृष्टीने सखोलपणे समजावून घेतले पाहिजेत. त्या त्या विषयातील तज्ज्ञांचा प्रत्येक समस्येचे अलगपणे, तुटकपणे विश्लेषण करण्याकडे कल असतो. अशा सखोल विश्लेषणाची गरज असते हेही खरेच; परंतु विश्लेषण चालू असताना समस्यांच्या परस्परसंबंधाकडे–विशेषतः आर्थिक आणि राजकीय संबंधाकडे–दुर्लक्ष झाले तर प्राप्त झालेले ज्ञान हे अगदी मर्यादित, एकांगी स्वरूपाचे ठरते व उपाययोजनेच्या दृष्टीने त्याला फारच थोडी किंमत असते. म्हणून माझ्या व्याख्यानात भारतापुढील बिकट परिस्थितीचे आर्थिक आणि राजकीय अशा दोन्ही दृष्टींनी विवेचन करण्याचा माझा विचार आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग पंचवार्षिक योजनांत अपेक्षिल्यापेक्षा फारच कमी आहे, इतकेच काय सबंध अर्थव्यवस्थाच जवळजवळ मोडकळीला आलेली आहे, असा समज आज सगळीकडे पसरलेला आहे. देशाच्या नियोजित भांडवल गुंतवणुकीचा बराच मोठा भाग भारी उद्योगधंद्यांकडे जातो; म्हणजेच, दीर्घ कालावधीत पूर्ण होणाऱ्या व चालू उत्पादनात फारशी भर न घालणाऱ्या प्रकल्पांचे आधिक्य हे याचे कारण आहे असे काही लोक सांगतात. आणि त्या आधारे असेही दर्शविले जाते की आजचा आर्थिक पेचप्रसंग शेती व दैनंदिन, ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उद्योगधंद्यांतील अपुऱ्या गुंतवणुकीचा परिणाम आहे.

जरा बारकाईने चिकित्सा केल्यास हे निदान टिकू शकत नाही. गेल्या काही वर्षांत साध्य झालेल्या आर्थिक विकासाच्या प्रत्यक्ष वेगाचा प्रश्न क्षणभर बाजूला ठेवला तरी, भारी उद्योगधंद्यांच्या वाढीच्या योजना साकार व्हायला इतर योजनांच्या मानाने नेहमीच फार वेळ लागतो हे म्हणणे बरोबर नाही. या योजनांचे पूर्वनियोजन केले असले, तर त्यातील फारच थोड्या योजना पूर्ण होण्यास चार पाच वर्षांच्या कालावधीपेक्षा जास्त काळ लागतो.

आणि विकासाकरता ज्या इतर विभागांत गुंतवणूक करावी लागते अशा अनेक विभागांत लागणाऱ्या कालावधीपेक्षा हा कालावधी काही फार जास्त नाही. पुष्कळ वेळा मोठ्या धरण-योजना फलद्रूप होण्यास याहीपेक्षा अधिक कालावधी लागतो. शिवाय, उपलब्ध असलेल्या धरण योजनांचा अपुरा उपयोग केला जातो किंवा सूत, कापड गिरण्यांसारख्या ग्राहकोपयोगी वस्तूंच्या काही उद्योगविभागांत उत्पादनशक्तीचा (installed capacity) उपयोग पुरेपूर केला जात नाही हे पाहिल्यावर अपुरी भांडवल गुंतवणूक हा या उद्योगविभागांतील शीघ्र प्रगतीत अडथळा आहे असे म्हणता येणार नाही.

वस्तुतः १९६२–६३ पर्यंत (या वर्षापर्यंतच राष्ट्रीय उत्पन्नाची तपशीलवार आकडेवारी उपलब्ध आहे.) भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग पंचवार्षिक योजनांत अपेक्षिल्याप्रमाणेच जवळजवळ होता. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांची उद्दिष्टे काही प्रमाणात वाढविण्यात आली होती तरीही, १९६२–६३ साली राष्ट्रीय उत्पन्नाचे लक्ष्य १९५०–५१ च्या अंदाजी उत्पन्नापेक्षा फक्त ६० टक्कयांनीच अधिक ठेवलेले होते. याचा अर्थ या बारा वर्षांत विकासाचा वेग दरसाल चार टक्के येतो. स्थिर किंमतींवर आधारलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या अधिकृत आकडेवारीवरून या काळात विकासाचा चक्रवाढ वेग ३½ टक्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या अधिकृत आकडेवारीत अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांतील वाढ वास्तवापेक्षा कमी धरली गेली आहे असे मानण्यास सबळ कारणे आहेत. उदाहरणार्थ, राष्ट्रीय उत्पन्नाच्या सरकारी मालिकेत लघुउद्योगधंद्यांच्या उत्पादनातील वाढ प्रतिवर्षी १ टक्कयांपेक्षाही कमी दाखविली आहे. याउलट इतर काही पुराव्यांवरून असे दिसते की या क्षेत्रात प्रतिवर्षी जवळजवळ ५ टक्कयापर्यंत उत्पादनवाढ झालेली आहे. कमी मोजण्याच्या किंवा न्यूनमितीच्या (under-estimation) अशा मर्यादा लक्षात घेत-

त्यावर या काळातील राष्ट्रीय उत्पन्नातील नियोजित वाढ व प्रत्यक्ष झालेली वाढ यांतील फरक, असलाच तर, नगण्य आहे असे आढळून येईल.

त्याचप्रमाणे अगदी अलिकडील काळात विकासाचा वेग घटत चालला आहे असे म्हणण्यासही काही विशेष आधार नाही. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत राष्ट्रीय उत्पन्न प्रतिवर्षी साधारणत: २½ टक्क्यांनी वाढले हे खरे आहे. परंतु द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतील विकासाचा वेग याहीपेक्षा कमी होता. कृषिउत्पादनात दरवर्षी वाढ घट होते व त्याचा राष्ट्रीय उत्पन्नावर इतका परिणाम होतो की, दोनतीन वर्षांतील विकासाच्या वेगावर होणारा त्याचा परिणाम केवळ हवामानाचा परिणाम आहे असे मानायला हवे. आजच तृतीय पंचवार्षिक योजनेच्या तिसऱ्या वर्षात राष्ट्रीय उत्पन्न जवळजवळ ४½ टक्क्यांनी वाढलेले आहे, आणि, कृषिउत्पादनाचे सध्याचे अंदाज जर बरोबर ठरले तर, योजनेच्या चौथ्या वर्षात राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ प्राय: ६ टक्क्यापेक्षा कमी होणार नाहीच ! उलट ती अधिकच होण्याची शक्यता आहे. एवंच, प्रतिवर्षी सरासरी कमीतकमी ३½ टक्क्यांनी तरी अर्थव्यवस्थेचा विकास होतो आहे असे ठामपणे म्हणणे शक्य आहे.

आज आपल्यापुढे उभ्या असलेल्या समस्यांमुळे या महत्त्वाच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविक असले तरी समर्थनीय नाही. १९५०–५१ पासून भारताचा जो आर्थिक विकास झाला आहे त्याचा वेग पूर्वी ब्रिटिश अमदानीत झालेल्या विकासाच्या दुपटीतिपटीने तरी जास्त आहे. गेल्या तेरा वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नात जी शेकडा वाढ झाली आहे ती आधीच्या पन्नास वर्षांतील वाढीपेक्षा शेकडेवारीच्या दृष्टीने जास्त आहे. जपान हे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात झपाट्याने आर्थिक विकास साधणारे राष्ट्र होय असे सर्वसामान्यपणे मानले जाते परंतु १८९३ ते १९१२ या काल-

खंडात जपानच्या राष्ट्रीय आर्थिक विकासाचा वेग प्रतिवर्षी प्रतिशत ३ पेक्षा थोडा कमीच होता; आणि त्यानंतरच्या दशकातही ही वाढ प्रतिवर्षी प्रतिशत ४ पेक्षा अधिक झाली नाही. अशा प्रकारच्या निकषांच्या अनुषंगाने पाहिल्यास गेल्या पंधरा वर्षांत भारतात झालेली प्रगती ही नक्कीच समाधानकारक आहे.

कुणी असे विचारील, की मग घोडे कुठे पेंड खाते आहे? इतके गंभीर आर्थिक संकट आजच एकदम का निर्माण झाले आहे? या प्रश्नाचे उत्तर थोडक्यात देणे शक्य आहे व आजच्या पेचप्रसंगाच्या प्रमुख अंगांकडे लक्ष केन्द्रित करण्यास मदत होईल अशा गोष्टींच्या सहाय्याने मी ते देण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रथमतः हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, जरी अर्थव्यवस्थेचा प्रतिवर्षी साधारणतः ३½ टक्के दराने विकास होत असला तरी, तृतीय पंचवार्षिक योजनेत ठरविलेली भांडवल गुंतवणूक आणि उंचावत जाणारे उपभोगाचे मान या दोन्हींची सोय होऊ शकेल यासाठी हा वेग पुरेसा नाही. प्रत्येक वर्षी जवळजवळ २½ टक्क्यापेक्षा, कदाचित थोडी अधिकच, एवढ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत चालली आहे. दरवर्षी लोकसंख्येत ज्यांची भर पडत आहे त्यांच्या दैनंदिन गरजा भागवून आणि भांडवल गुंतवणुकीत नियोजित वाढ केल्यावर पुन्हा दरडोई उपभोगाचे मान वाढवायचे असेल तर कमीतकमी ५ ते ६ टक्के या प्रमाणात अर्थव्यवस्थेचा विकास व्हावयास हवा.

तथापि, काही वर्षे उपभोगाचे मान स्थिर प्रमाणावर ठेवणे एवढ्याने जर प्रश्न सुटला असता, तर गेल्या दीड वर्षांत जेवढा ताण पडला आहे तितका तो पडला नसता. या ताणामध्ये दोन गोष्टींनी अधिकच भर घातलेली आहे आणि त्यामुळे आजच्या बिकट परिस्थितीत कडेलोट झाला आहे. १९६२ पासून संरक्षणावर करावा लागणारा जादा खर्च व अन्नधान्याचा पुरेसा साठा करण्यातील अपयश, या त्या दोन गोष्टी होत.

सर्वसाधारणपणे हे कधीच लक्षात घेतले जात नाही की,

संरक्षणखर्चामुळे साधनसामग्रीवर जो जादा ताण पडतो आहे तो तृतीय पंचवार्षिक योजनेतील नियोजित भांडवल गुंतवणुकीमुळे पडणाऱ्या अपेक्षित अधिक ताणापेक्षा जास्त आहे. तृतीय पचवार्षिक योजनेप्रमाणे अर्थव्यवस्थेतील एकूण भांडवली खर्च १९६०–६१ मधील साधारणतः रु. १६०० कोटी पातळीवरून १९६५–६६ पर्यंत साधारणतः २६०० कोटी रुपयांपर्यंत, म्हणजेच साधारणतः १००० कोटी रुपयांनी वाढला असता; तथापि ही वाढ पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने करावयाची असल्यामुळे १९६३–६४ मधील भांडवलगुंतवणुकीची पातळी १९६०–६१ पेक्षा ४५०–५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक असण्याची शक्यता नव्हती; परंतु याच १९६०–६१ ते १९६३–६४ या काळात संरक्षण खर्च जवळजवळ ५२५ कोटी रुपयांनी वाढवावा लागला.

अशा प्रकारे भांडवलगुंतवणूक आणि संरक्षणावरील खर्च या दोहोंनी मिळून तृतीय योजनेच्या तिसऱ्याच वर्षात, जेवढी पातळी योजनेच्या शेवटच्या वर्षापर्यंत गाठावयाची कल्पना होती इतक्या अधिक साधनसामग्रीचा उपयोग केला. दुसरे, या काळात राष्ट्रीय उत्पन्नात मंद गतीने वाढ झाली आहे. त्यामुळेही साधनसामग्रीच्या उभारणीवर फारच ताण पडला आहे. योजनेच्या अखेर राष्ट्रीय उत्पन्नाची नियोजित वाढ ४५०० कोटी रुपये आहे. याउलट १९६३–६४ पर्यंत झालेली वाढ १९६०–६१ च्या उत्पादनापेक्षा १४०० कोटी रुपयांहून (१९६०–६१ च्या किंमतीमध्ये) अधिक झालेली नसावी.

उत्पादनातील वाढीपैकी १००० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम भांडवलगुंतवणुकीत व संरक्षणसिद्धतेत खर्च झाल्यावर खाजगी उपभोगाकरता वाढीपैकी तिसऱ्या हिश्श्यापेक्षाही कमीच भाग उपलब्ध झाला. मध्यंतरी लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे दरडोई खाजगी उपभोगाचे मान कमीच झाले असणार. या काळात वाढलेल्या उत्पन्नातून शिल्लक टाकण्याचे प्रमाण नेहमीच्या बचतीच्या वेगापेक्षा बरेच जास्त ठेवणे भाग पडले. परिणामतः

संरक्षण व विकास यांसाठी केलेल्या खर्चामुळे झालेल्या जादा मिळकतीमुळे वाढलेली ग्राहकोपयोगी वस्तूंची मागणी आणि ही मागणी पुरवण्यासाठी मर्यादित प्रमाणातच उपलब्ध होऊ शकलेला अधिक साठा यातील असमतोलामुळे गतवर्षी किमती वाढल्या. वर वर्णिलेल्या परिस्थितीत किमतीत काही वाढ होणे खरोखरीच अटळ होते.

तथापि गतवर्षी अन्नधान्यांच्या किमतीत जी भरमसाठ वाढ झाली (पुष्कळ राज्यांत ही वाढ ५० टक्कयांपेक्षाही जास्त झालेली आहे)–आणि विशेषतः गरीब वर्गांना तिचे जे तीव्र चटके बसले–या सर्वांचे पुरे स्पष्टीकरण वरील विवेचनाने होत नाही. १९६०–६१ साली देशातील अन्नधान्याचे उत्पादन ८१ दशलक्ष टन झाले होते आणि १९६१–६२ सालीही साधारणतः ते तितकेच झाले. १९६२–६३ साली हे उत्पादन ७९ दशलक्ष टनांपेक्षा थोडेसे खाली घसरले, परन्तु १९६३–६४ साली ते पुन्हाः साधारणतः ८० दशलक्ष टनांपर्यंत वाढले. म्हणजेच अन्नधान्य उत्पादनात वस्तुतः फारशी घट झालेली नाही. तथापि, या काळात लोकसंख्या वाढली आणि अन्नधान्याचे उत्पादन वाढले नाही असे म्हणता येईल. शिवाय १९६०ते६४ या काळात अन्नधान्याची आयात दरवर्षी सरासरी ४५ लाख टन इतकी झालेली आहे; याउलट तत्पूर्वीच्या ४ वर्षांत प्रतिवर्षी सरासरी ३० लाख टनांपेक्षा कमी अन्नधान्य आयात करण्यात आले होते. म्हणून, जर देशातील चांगल्या पिकांच्या दिवसात अन्नधान्याच्या आयातीचा उपयोग राखीव साठे करण्याकडे आणि वाईट हंगामात पूरक म्हणून वापरण्याकडे केला असता, तर या काळात प्रत्येक व्यक्तीला जो अन्नधान्याचा साठा उपलब्ध झाला असता त्यात पूर्वीपेक्षाही घट येण्याचे काहीच कारण नव्हते.

पण अन्नधान्याच्या तीव्र टंचाईची चिन्हे सर्वत्र दिसू लागली आहेत आणि त्याची कारणेही उघड आहेत. १९६०ते६४ या काळात, किंबहुना १९६०–६१ आणि १९६१–६२ या वर्षीही—

म्हणजे ज्या वेळी भरघोस पिकांमुळे देशांतर्गत अन्नधान्य उत्पादनाचा उच्चांक गाठला होता— सरकारने आयात केलेल्या धान्यापैकी दरवर्षी ३५ लाख टनांपेक्षाही जास्त धान्य जनतेच्या उपयोगाकरिता उपलब्ध करून दिले होते. याचा दुहेरी परिणाम झालेला आहे : एक म्हणजे १९६० ते ६३ या काळामध्ये आयात केलेल्या १ कोटी २० लक्ष टन अन्नधान्यापैकी सरकारी राखीव साठे करण्यास केवळ ७॥ लाख टनांपेक्षा थोडेसेच जास्त धान्य शिल्लक राहिले. याचा परिणाम असा झाला की, नंतरच्या वर्षी देशातील घटलेल्या उत्पादनावर वाढलेल्या मागणीचा जो ताण पडला तो दूर करण्याच्या दृष्टीने ते राखीव धान्य अगदीच अपुरे पडले. दुसरा परिणाम म्हणजे— आणि दीर्घकालीन परिणामाच्या दृष्टीने याला अधिक महत्व आहे— भरघोस पिकाच्या दिवसात आयात केलेले धान्य मोठ्या प्रमाणात जनतेला उपलब्ध करून दिले गेल्याने औद्योगिक उत्पादनापेक्षा अन्नधान्यांच्या किमती सापेक्षतः स्वस्त राहिल्या. त्याचा परिणाम असा झाला की, धान्योत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन देतील ( किंवा कमीतकमी उत्साहभंग तरी करणार नाहीत ) अशा तौलनिक किमतींचा समतोल राखण्यात सरकारला काही स्वारस्य वाटत नाही असा शेतकऱ्यांचा समज झाला.

औद्योगिक उत्पादनाच्या ठोक किमतींचा निर्देशांक १९५८–५९ सालातील १०८·४ या बिंदूपासून (१९५२–५३ हे पायाभूत वर्ष* धरून) १९६१–६२ मध्ये १२६·६ या बिंदूपर्यंत वाढला

* १९४९–५० नंतर दोन वर्षेपर्यंत शेती उत्पादनात घट होत होती; १९५२–५३ साली ते सुधारण्याला सुरवात झाली. दुसरे महायुद्ध, १९४७ साली झालेली देशाची फाळणी व कोरियन युद्ध यामुळे चलनवाढीचा जो सुप्त दाब निर्माण झाला होता तोहि १९५२–५३ साली ओसरला होता. तेव्हा शेती व कारखानदारीतील उत्पादनाच्या दरम्यानची व्यापारी परिस्थिती त्यावर्षी बरीच समाधानकारक असल्याने ते वर्ष पायाभूत मानणे सयुक्तिक आहे.

त्याच वेळी अन्नधान्यांच्या किंमतींचा निर्देशांक १९५८–५९ सालातील १०६·३ या बिंदूपासून १९६१–६२ मध्ये १००·४ या बिंदूपर्यंत उतरला. म्हणजे अन्नधान्याच्या उत्पादकांविरुद्ध व्यापार परिस्थिती बिघडविण्यात सरकार सक्रीयपणे सहभागी झाले. हे थोडेसे विस्मयजनक आहे. आयात केलेल्या धान्यात गव्हालाच अधिक प्राधान्य आहे, आणि १९५८–५९ नंतर अमेरिकेच्या मदतीच्या पी. एल्. ४८० या कार्यक्रमानुसार भरपूर पुरवठा उपब्लध होऊ लागला तेव्हापासून गव्हाच्या देशांतर्गत उत्पादनाच्या तुलनेने आयात केलेल्या गव्हाचे प्रमाण फार मोठे राहिलेले आहे. १९५८–५९ मध्ये गव्हाच्या अंतर्गत उत्पादनाच्या $\frac{1}{3}$ पेक्षाही अधिक गहू आयात करण्यात आला. आणि १९६०–६१ मध्ये देशातील उत्पादनाच्या जवळजवळ निम्मा गहू आयात करण्यात आला. स्वाभाविकच या काळात गव्हाच्या ठोक किंमतींचा निर्देशांक फारच खाली आला. १९५८–५९ मध्ये १०५ असलेला हा निर्देशांक १९५९–६० मध्ये ९६ पर्यंत खाली आला, १९६०–६१ मध्ये ९० पर्यंत खाली आला आणि त्यानंतरच्या दोन वर्षात साधारणतः त्याच पातळीवर राहिला. तांदुळाची आयात ही फारच थोडया प्रमाणावर, म्हणजे देशातील उत्पादनाच्या ३ किंवा ४ टक्क्यांपेक्षा अगदी क्वचितच अधिक झालेली आहे. आणि म्हणून तांदुळाच्या ठोक किंमतींचा निर्देशांक या काळात १०५ पेक्षा कधीच खाली गेला नाही. १९६२–६३ मध्ये ज्या वेळी गव्हाचा निर्देशांक ९० होता त्या वेळी तांदुळाचा निर्देशांक १११ होता.

भारतातील पिकांच्या उत्पादनासंबंधीच्या अलीकडील काही पाहणींवरून असे दिसू येते की, भाताचे दर एकरी उत्पादन वाढते असले तरी गव्हाच्या बाबतीत मात्र ते स्थिर राहिले. तांदूळ आणि गहू या पिकांच्या दर एकरी उत्पादनात असा फरक का पडावा याची कारणे फारशी समजू शकलेली नाहीत– चीनमध्ये देखील साधारणतः अशीच परिस्थिती दिसून आलेली आहे– आणि आताच याबद्दल काही सर्वसामान्य निष्कर्ष काढता येणे शक्य

नाही; तथापि, एक संभवनीय, भारताच्या बाबतीत तरी, अंशतः स्पष्टीकरण असे देता येईल की, आयात केलेला गहू मोठ्या प्रमाणावर बाजारात उपलब्ध करून दिला गेल्यामुळे गव्हाच्या किमतीत जो चढउतार झाला त्यामुळे तांदुळापेक्षा गव्हाच्या किमतीबद्दल अधिक अनिश्चितता उत्पन्न झाली. परिणामतः उत्पादकांनी खते, पाणी वगैरेसारख्या उत्पादक घटकांचा ओघ, जेथे शक्य होते तेथे, कापसासारख्या अधिक भरवशाच्या पिकांकडे वळविला.

देशातील तांदुळाच्या उत्पादनाच्या फारच थोड्या अंशाने तांदुळाची आयात केली जाते तरी, गेल्या वर्षी गव्हाच्या किमतीपेक्षा तांदुळाच्या किमतीत फारच थोड्या प्रमाणात वाढ झालेली आहे, हे लक्षात घेणे थोडेसे आवश्यक आहे. १९६१–६२ ते १९६२-६३ या दरम्यान तांदुळाचे उत्पादन ३ कोटी ४८ लाख टनांवरून ३ कोटी १९ लाख टनांपर्यंत घसरले आणि म्हणून १९६२–६३ मध्ये १११ असलेला तांदुळाच्या ठोक किंमतीचा निर्देशांक १९६३–६४ मध्ये १२५ पर्यंत वाढला; १९६४ च्या एप्रिल ते आक्टोबर या काळात तो आणखीनच वाढून १४४ वर गेला. परंतु तांदुळाचे नवीन पीक हाती आल्याने हा निर्देशांक खाली उतरू लागला असून १९६४ च्या डिसेंबरच्या अखेरीस तो १२८ पेक्षा कमी पातळीवर आहे. गव्हाच्या बाबतीत मात्र किंमतीचा निर्देशांक १९६२–६३ मधील ९० वरून १९६३–६४ मध्ये ९९ पर्यंतच वाढला. परंतु १९६४ च्या आक्टोबरमध्ये त्याने १३५ ची पातळी गाठली आणि, गव्हाच्या आयातीचा प्रचंड ओघ सारखा वहात असतानाही, डिसेंबरच्या अखेरीस तो १४६ पर्यंत वाढला. एवंच, तांदुळाची किंमत गतवर्षी या वेळी असलेल्या किंमतीपेक्षा आता फक्त सहा टक्क्यांनी, आणि १९६२–६३ च्या पातळीच्या किंमतीपेक्षा १५ टक्क्यांनी अधिक आहे; तर गव्हाच्या किंमती गतवर्षी यावेळी होत्या त्यापेक्षा ४६ टक्क्यांनी, आणि १९६२–६३ च्या किंमतीपेक्षा ६० टक्क्यांनी अधिक आहेत

गव्हाच्या अंतर्गत उत्पादनास पूरक म्हणून ज्या धान्याची मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते त्या गव्हाची किंमत ६० टक्क्यांनी वाढावी, तर ज्या धान्याचा पुरवठा हा जवजवळ संपूर्णपणे देशातील उत्पादनावर अवलंबून आहे त्या तांदुळाच्या किंमती मात्र फारच थोड्या प्रमाणात वाढाव्यात, हे कोणालाही विरोधाभासात्मकच वाटेल. १९५२–५३ शी तुलना करता अथवा १९५८-५९ शी तुलना करता तांदुळाच्या किंमतीत जी प्रतिशत वाढ झालेली आहे (गेल्या हंगामापूर्वीच्या काही महिन्यांचा अपवाद सोडून) ती वाढ औद्योगिक उत्पादनाच्या किंमतीत झालेल्या प्रतिशत वाढीपेक्षा जास्त नाही, याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

म्हणूनच आजच्या अन्नधान्यविषयक बिकट परिस्थितीची मीमांसा करणे हे सकृद्दर्शनी वाटते त्यापेक्षा कितीतरी कठीण काम आहे. व्यापाऱ्यांची साठेबाजी किंवा संरक्षणखर्च आणि भाडवलगुंतवणुकी यामुळे झालेली मागणीतील वाढ यांचा तो परिणाम आहे, असे म्हणण्याने अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीचे संपूर्ण स्पष्टीकरण होत नाही. ह्या गुंतागुंतीच्या परिस्थितीचे कारण केवळ या तीन गोष्टींचा परिणाम एवढेच असते तर, मग या काळात तांदुळाच्या किंमतीत झालेली वाढ ही, जास्त नाही तरी, कमीतकमी गव्हाच्या किंमतीइतकी तरी व्हावयास पाहिजे होती अशी अपेक्षा अस्थानी होणार नाही.

१९६१–६२ मध्ये तांदुळाच्या उत्पादनाने ३ कोटी ४८ लाख टन इतकी उच्च पातळी गाठली असून त्यानंतर ते वाढतच आहे. १९६३–६४ मध्ये तांदुळाचे उत्पादन जवळजवळ १७ लाख टनांनी वाढलेले होते. तथापि गव्हाचे उत्पादन मात्र १९६१–६२ मधील १ कोटी २० लाख टनांवरून १९६२–६३ मध्ये १ कोटी ८ लाख टनांवर घसरले; आणि १९६३–६४ मध्ये ९७ लाख टनापर्यंत खाली आले. गतवर्षी तांदुळाचे उत्पादन तत्पूर्वीच्या दोन वर्षांपेक्षा ५ टक्क्यांनी वाढलेले होते, तर गव्हाचे उत्पादन जवळजवळ २० टक्क्यांनी घटलेले होते.

गव्हाच्या उत्पादनात झालेल्या घसरगुंडीमुळे शेतकरी विकत असलेल्या गव्हाच्या परिमाणावर प्रमाणापेक्षा अधिक परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. उत्पादकांच्या गरजेपुरते शिल्लक ठेवून अधिक राहिलेले जे धान्य बाजारात येते त्याचा $\frac{1}{3}$ ते $\frac{2}{3}$ भाग १० एकरापेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकरी वर्गाकडून येतो. आपली पैशाची कमीतकमी गरज भागविण्याइतका पैसा मिळविण्यासाठी या वर्गाकडून त्यांच्या उत्पादनाचा जो भाग विकला जातो तो त्यांच्या लगतच्या वरील वर्गातील, म्हणजेच १० ते १५ एकर जमीन असलेल्या, शेतकऱ्यांकडून विकल्या जाणाऱ्या हिश्श्यापेक्षा कितीतरी मोठा असतो. परन्तु, जेव्हा अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे या वर्गातील लोकांचे उत्पन्न एकदम वाढते, तेव्हा पुष्कळ वेळा त्याचा ताबडतोब परिणाम ते उत्पादनाचा अधिक भाग स्वतःच उपयोगात आणतात आणि कमी भाग विकतात अशा स्वरूपाचा होतो. उत्पादकांच्या उपभोगात ही जी सीमान्त भर पडते ती त्यांच्या राहणीमानातील फरक कळून येण्याइतकी सहसा सुस्पष्ट नसते. परंतु जेव्हा लाखांच्या संख्येतील छोटे उत्पादक त्यांच्या उत्पादनापैकी बाजारात न्यावयाचा भाग कमी करतात, तेव्हा बाजारात उपलब्ध होणाऱ्या एकूण पुरवठ्यावर त्याचा चांगलाच परिणाम होतो. गतवर्षी बाजारभाव बराच वधारल्यामुळे विक्रीसाठी उपलब्ध होणाऱ्या अन्नधान्याच्या, विशेषतः गव्हाच्या, साठ्यात बरीच घट झालेली असण्याची शक्यता आहे.

जर पुढील वर्षी (किंवा पुढील काही वर्षांत) उत्पादनात चांगलीच वाढ होण्याची शक्यता नसेल तरीदेखील विक्रीसाठी येणाऱ्या धान्याच्या परिमाणात घट होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत मोठ्या वर्गातील आणि मध्यम वर्गातील शेतकरी नेहमीपेक्षा आपल्या उपभोगात यत्किंचितही वाढ न करता पुढे अधिक किंमत मिळण्याच्या आशेने धान्याचे साठे करून ठेवतात. ही साठेबाजी सट्टेबाजीच्या स्वरूपातील असते

यात शंकाच नाही. परंतु सट्टेबाज व्यापाऱ्यांच्या कारवायांपेक्षा वेगळ्या स्वरूपाचे प्रश्न त्यातून निर्माण होतात आणि वेगळ्या स्वरूपाची अनुशासकीय व राजकीय गुंतागुंत त्यातून निर्माण होते.

गतवर्षी गव्हाच्या बाबतीत वरील दोन्ही गोष्टींचा परिणाम झाला असला पाहिजे. १९६१–६२ साली १ कोटी २० लाख टन उत्पादनापैकी उत्पादकांनी जर ५० लाख टनच गहू विक्रीसाठी बाजारात पाठविला असेल, तर १९६३–६४ साली झालेल्या ९५ लाख टन उत्पादनापैकी विक्रीचा भाग २० लाख टनांपर्यंत खाली सहजच आला असेल. याचा अर्थ असा की, समजा १९६१–६२ साली आयात केलेल्या गव्हासह साधारणतः ८५ लाख टन गहू बाजारात उपलब्ध होता, तर त्याच पातळीवर पुरवठा ठेवण्यासाठी १९६३–६४ साली आयात केलेल्या गव्हापैकी साधारणतः ६५ लाख टन गहू बाजारात उपलब्ध करून द्यावयास पाहिजे होता. परंतु आपल्या सरकारने आयात केलेल्या गव्हाचा आवश्यक तेवढा साठा करून ठेवलेला नव्हता आणि गव्हाची चालू आयात जरी मोठ्या प्रमाणावर असली तरी बाजारात वाटणारी गव्हाची चणचण भरून काढण्यास ती पुरेशी नव्हती. गेल्या वर्षी आयातीचा ओघ अखंडितपणे चालू असताही गव्हाच्या किंमतीत एकदम जी वाढ झाली त्याचे कारण हेच असावे.

तांदुळाच्या बाबतीत देखील, गतवर्षी झालेल्या भाववाढीमुळे बाजारात येणारा तांदुळाचा पुरवठा थोडासा कमीच झाला असण्याची शक्यता आहे. परंतु ६३–६४ साली झालेली तांदुळाच्या उत्पादनातील वाढ आणि पुढे आणखी उत्पादन वाढण्याची अपेक्षा यामुळे स्वाभाविकच तांदुळाच्या भाववाढीला बराच आळा बसला आहे. तांदुळाची समस्या ही मुख्यतः झोनल पद्धतीमुळे वेगवेगळ्या राज्यात पुरवठा सदोष होण्याने उद्भवली आहे. यात तांदूळ अधिक पिकविणाऱ्या राज्यातील धान्योत्पादकांच्या हितसंबंधियांच्या राजकीय दडपणाची भर पडली आहे.

आतापर्यंत केलेले या समस्येचे संक्षिप्त विश्लेषण बरोबर असेल, तर नजिकच्या आणि दूरवरच्या भविष्यकाळाच्या धोरणांबाबतीत काय निर्णय घ्यावेत असा प्रश्न उपस्थित होतो, आणि मी आता प्रश्नाच्या त्याच बाजूकडे वळणार आहे.

१९६३–६४ साली संरक्षणावरील खर्चात एकदम वाढ झाली. पण आता तो खर्च साधारणतः रु. ८० कोटी ठरून गेला आहे आणि १९६४–६५ या सालातील भांडवलगुंतवणूकही पूर्वीच्या पातळीपेक्षा रु. २०० कोटीहून अधिक होण्याची शक्यता नाही. म्हणून, जर चालू वर्षी राष्ट्रीय उत्पादनाची पातळी १९६३–६४ च्या पातळीपेक्षा ७% किंवा त्याहून अधिक वाढली, आणि तेवढी ती वाढण्याची शक्यता वाटते आहे, –तर उपलब्ध पुरवठ्यावरील मागणीचा ताण निश्चितच कमी होईल. उत्पादनातील अपेक्षित वाढीचा बराचसा भाग हा शेतीच्या उत्पादनाचा असेल. वाढलेल्या शेतीच्या उत्पादनाचा बाजारातील पुरवठ्यावर परिणाम व्हावयास थोडासा अधिक वेळ लागतो. म्हणून ऑगस्ट किंवा सप्टेंबर पर्यंत अन्नधान्याच्या किमती फारशा उतरण्याची शक्यता नाही. परंतु चालू वर्षी अन्नधान्याचे भाव उतरू लागतील याबाबतीत शंका असण्याचे कारण नाही.

जेव्हा अन्नधान्याच्या किमती उतरू लागतात तेव्हा सट्टेबाजीच्या दृष्टीने पूर्वी करून ठेवलेले साठे तावडतोब बाहेर काढले जातात व त्यामुळे किमती आणखी झपाट्याने उतरू लागतात. धान्याच्या किमतींची ही प्रवृत्ती पुढील वर्षी दिसून येईल किंवा नाही हे आताच काही सांगता येत नाही. कारण वाढलेल्या उत्पादनाचा काही भाग गेल्या वर्षी कमी झालेले राखीव साठे भरून काढण्याकडे केला जाईल. परंतु दीर्घकालीन धोरणाच्या दृष्टीने ज्या एका गोष्टीची काळजी घेतली पाहिजे ती म्हणजे, अन्नधान्याच्या उत्पादकांना नुकसानकारक होण्याइतके बाजारभाव खाली घसरू देता कामा नयेत. १९५२–५३ हे पायाभूत वर्ष धरल्यास औद्योगिक उत्पादनाच्या ठोक किमतींचा निर्देशांक सध्या

१४० आहे. शेतीपासून मिळणाऱ्या कच्च्या मालाची किंमत कमी झाल्यामुळे हा निर्देशांकही घटण्याची शक्यता असली, तरी तो १३५ च्या खाली जाईल अशी अपेक्षा करणे अवास्तव होईल. अन्नधान्योत्पादकांना नुकसानकारक ठरेल अशी किंमतींची वाटचाल रोखण्यासाठी तांदूळ व गहू यांच्या किंमतीचा निर्देशांक शक्यतो १२५ च्या, आणि कुठल्याही परिस्थितींत १२० च्या, खाली जाणार नाही अशी दक्षता घेणे आवश्यक आहे. अशी काळजी घेतल्यामुळे १९६३–६४ पूर्वी औद्योगिक उत्पादन व धान्याच्या किंमतीचे जे प्रमाण होते तेच प्रमाण औद्योगिक उत्पादन व धान्याच्या किंमती याबाबतीत पुन्हा अस्तित्वात येईल. येथे हे लक्षात घ्यावयाला पाहिजे की, जे दोन निर्देशांक सुचविले आहेत त्यातल्या उच्च निर्देशांकाच्या अगदी जवळ तांदुळाचा ठोक किंमतीचा निर्देशांक अगोदरच आला आहे.

तथापि, राजकीय व कारभारविषयक दोन्ही कारणास्तव अन्नधान्याच्या किंमतींची घसरगुंडी रोखण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याचे टाळले जाईल असे दिसते.

संरक्षण तयारीवरील वाढत्या खर्चाची तरतूद करण्यासाठी १९६३–६४ साली जी करवाढ करण्यात आली तिचा बराच मोठा भाग वस्तूंवरील कराच्या स्वरूपाचा होता. त्याच वर्षी शेतीच्या धंद्यास उपकारक होईल अशा तऱ्हेने झपाट्याने भाववाढ झाल्यामुळे, परिणामत: शहरी भागातील कमी आणि बांधलेल्या ( fixed ) उत्पन्नाचे वर्ग, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर यांनाच प्राय: संरक्षणखर्चामुळे वाढलेल्या या करांचे संपूर्ण ओझे सहन करावे लागलेले आहे. सध्याचे असंतोष व निराशेचे वातावरण निर्माण होण्याला गेल्या वर्षीच्या हालअपेष्टांबाबतची शहरी विभागातील बोलक्या वर्गाची प्रतिक्रिया विशेष कारणीभूत झालेली असल्याने, चालू वर्षी उपरोक्त वर्गांना लौकरात लौकर काही सवलत देण्याचा मोह राजकीय दृष्ट्या होईल. आणखी असे की, धान्याची खरेदी व साठवण यासाठी

आवश्यक असलेली यंत्रणाही अद्याप उभारली गेलेली नाही. याला शिवाय एक राजकीय बाजूही आहे. धान्याची सरकारी पातळीवर मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री करण्यास व्यापार आणि शेती व्यवसायातील बड्या हितसंबंधीयांचा विरोध आहे व राज्यांतील राज्ययंत्रणेवर त्यांचे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वजन आहे. त्यामुळे एकदा ही आणीबाणीची परिस्थिती कमी झाली म्हणजे या दृष्टीने भरीव प्रगती करण्यास या हितसंबंधीयांकडून अडथळा उत्पन्न केला जाईल.

कारभारयंत्रणेचा सुस्तपणा, संकुचित पक्षहित, हितसंबंधीयांचे राजकीय दडपण याला जर सरकार बळी पडले आणि धान्योत्पादकांना नुकसानकारक ठरणारी बाजारभावाची परिस्थिती निर्माण झाली तर ते मोठेच दुर्दैव म्हणावे लागेल. भाव वाढलेल्या स्थितीत असताना हा फार दूरचा विचार वाटेल; परंतु आगामी वर्षात आयात केलेल्या धान्याच्या विवेकशून्य, अपरिमित विक्रीमुळे म्हणा, किंवा देशातील धान्योत्पादनात भरीव वाढ होईल त्या वेळी बाजारात उतरून धान्य खरेदी करण्यातील सरकारच्या अपयशामुळे म्हणा, धान्योत्पादकांना प्रतिकूल ठरणारा बाजारभावातील फरक अपेक्षेपेक्षा फारच लवकर घडून येईल अशी भीती वाटते. याउलट, जर किंमतींविषयी अधिक दूरदर्शीपणाचे धोरण परिणामकारकरित्या अंमलात आणले गेले तर, (चालू बाजारभावामुळे शेतीधंद्यास अगोदरच प्रोत्साहन मिळाले आहे,) त्यामुळे खतपुरवठा आणि पाणीपुरवठा यांचा अधिकाधिक उपयोग करण्याकडे प्रवृत्ती वाढून नजिकच्या भविष्यकाळात अन्नधान्याचे उत्पादन अधिकच वाढण्याची शक्यता आहे.

अर्थव्यवस्थेतील भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण सतत वाढत असल्यामुळे धान्याचे उत्पादन वाढत राहिले तरीही तुटीची परिस्थिती मधूनमधून निर्माण होईल अशी शक्यता आहे. याला आळा घालायचा असेल तर खुल्या बाजारात खरेदी करून राखीव साठे करणे आणि आवश्यक तेव्हा मोठ्या उत्पादकांवर खास लेव्ही

बसवून साठ्यात भर घालणे आवश्यक होईल. तेव्हा, आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याबरोबरच स्थैर्य टिकावे असे वाटत असेल, तर धान्यखरेदीची पुरेशी यंत्रणा निर्माण करण्याची अतिशय गरज आहे. भारतामध्ये सरकारकडून येत्या एक दोन वर्षात अशी यंत्रणा उभारली जाते, की बड्या हितसंबंधीयांच्या दडपणामुळे सध्याचे द्विधाधोरण चालवायचे आणि परिस्थिती अनावर झाली की स्थैर्य टिकविण्यासाठी विकासाचा बळी द्यायचा अशी भूमिका सरकार घेते यावर बरेच काही अवलंबून आहे. व्यापार व शेती यातील बड्या हितसंबंधीयांचा केंद्रसरकारपेक्षा राज्यसरकारांवर अधिक प्रभाव असल्यामुळे ( आताच दिसू लागल्याप्रमाणे ) या समस्येला केंद्रसरकार व राज्यसरकारे यातील झगड्याचे स्वरूप येईल अशी शक्यता आहे. या झगड्याच्या मुळाशी आधारभूत म्हणून काय आहे हे देशातील पुढाऱ्यांनी आणि जनतेनेही जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

दीर्घकालाच्या दृष्टीने आर्थिक उद्दिष्टे आणि धोरणे यांवर अशा परिस्थितीचा काय परिणाम होणार ? काही समाधानकारक वळण लागण्याची आशा आहे की सगळीकडे अनिश्चितता आणि निराशाच कायम राहाणार ? एकंदर धोरणात व पावित्र्यातच मूलगामी फरक घडवून आणला पाहिजे, का इकडे तिकडे काही किरकोळ सुधारणा करून काम भागण्यासारखे आहे ? सध्याची बिकट परिस्थिती पुढील काही महिन्यांत कशीतरी आटोक्यात आणण्याची खात्री असली तरी वरीलसारख्या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

भविष्यकाळात संरक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या अंदाजावर बऱ्याच गोष्टी अवलंबून राहतील. चालू किंमतींप्रमाणे राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम हल्ली संरक्षणावर खर्च केली जाते. दरिद्री देशाला हेच एक फार मोठे ओझे आहे. इतकेच नव्हे, तर सरकारला देशाच्या आर्थिक विकासासाठी जी साधनसामुग्री उभारणे शक्य आहे तिच्या तुलनेत हे प्रमाण हे अधिकच अवजड

ओझे आहे. जेव्हा राष्ट्राच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा स्वाभाविकत: केवळ आर्थिक दृष्टीतूनच निर्णय घेता येत नाहीत. माझ्या पुढच्या व्याख्यानात आगामी कालखंडात संरक्षणाच्या धोरणाशी संबंधित असणाऱ्या आर्थिक आणि राजकीय गोष्टींचा मी स्थूलमानाने परामर्श घेणारच आहे.

संरक्षणाचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवला तरी, भावी आर्थिक प्रगतीची आशा बरीचशी शेती विभागातील यश संपादनावर अवलंबून असणार हे अगदी उघड आहे. बिगर शेती विभागाची जलद गतीने वाढ झाली तरच वाढत्या लोकसंख्येला उत्पादनक्षम रोजगार मिळणे शक्य आहे आणि त्यादृष्टीने शेती महत्त्वाची की बिगरशेती उद्योग महत्त्वाचे हा प्रश्न निरर्थक आहे हे खरे. पण, बिगरशेती विभागाच्या वाढीमुळेदेखील धान्य, कच्चा माल आणि वाढती निर्यात यांसाठी शेतीवरील मागणी वाढते आणि या मागण्या पुरविल्या गेल्या नाहीत तर बिगर शेती विभागाच्या प्रगतीत गंभीर अडथळा निर्माण होतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवाय शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांचे ( येती वीस वर्षे त्यांचे प्रमाण ६०% पेक्षा कमी होणार नाही ) उत्पन्न वाढून त्यांची स्थिती सुधारावी व वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नात त्यांनाही योग्य तो हिस्सा मिळावा यासाठीही शेतीचे उत्पादन वाढणे अत्यंत आवश्यक आहे. अशा सर्व दृष्टींनी विचार केला असता शेतीच्या उत्पादनात पुढील काही वर्षांत प्रतिवर्षी कमीतकमी ५% तरी वाढ झाली पाहिजे.

हे उद्दिष्ट समोर ठेवून धोरण आखण्यात व त्याची अंमलबजावणी करण्यात एक मोठी अडचण अशी आहे की, आज शेतीविषयी फारच घाईघाईने व्यापक निष्कर्ष काढले जातात. अशाच तऱ्हेचा आज प्रसृत असलेला एक निष्कर्ष म्हणजे भारतातील शेतीची अवस्था स्थितिशील झाली असून गेल्या १५ वर्षांत तीत फारशी काही वाढ होऊ शकलेली नाही. याच कोटीतला दुसरा एक निष्कर्ष म्हणजे पंचवार्षिक योजनांतील शेती-

विषयक खर्चात जर वाढ केली तर कृषि उत्पादनात भरीव वाढ होऊ शकेल. यापैकी कोणताही निष्कर्ष खरा नव्हे. या क्षेत्रात आजपर्यंत जी प्रगती झाली आहे ती उपेक्षणीय नाही हे दाखविणे काही फारसे अवघड काम नाही. हे खरे की, दारिद्र्य आणि बेकारी यावर जोरदार आघात करण्यासाठी आर्थिक विकासाचा वेग पुरेसा वाढवायला जी ताकद शेती धंद्यात निर्माण व्हायला पाहिजे तेवढी शेतीची प्रगती झाली नाही. त्याचबरोबर हेही खरे की, अपेक्षित प्रमाणात कृषि उत्पादनाची प्रगती होण्यासाठी त्यावरील संकल्पित खर्च वाढविण्यापेक्षा इतर कितीतरी गोष्टींची आवश्यकता आहे. शेतीबाबतच्या चक्रव्यूहातून बाहेर पडायचे असेल तर प्रश्नाच्या या दोन्ही बाजूंचे सम्यक् आकलन करून घेणे आणि आपली उद्दिष्टे साध्य करून घेण्याच्या दृष्टीने काही विशिष्ट उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

आवश्यक असलेली निरनिराळ्या प्रकारची विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे, बराच काळपर्यंत, भारतातील कृषि-उत्पादनाच्या प्रगतीचा वेग नक्की अजमावणे कठीण होते. पीक-कापणी पद्धतीने पीक उत्पादनाची वारंवार पाहणी केल्याने आणि आकडे गोळा करून निष्कर्ष काढण्याच्या पद्धतीतील बऱ्याच सुधारणांमुळे वरील माहितीतील बऱ्याच उणिवा आता दूर झाल्या आहेत. आणि बरीचशी विश्वासार्ह अशी उत्पादनविषयक निर्देशांकमालिका आपल्याला उपलब्ध आहे. उपरिनिर्दिष्ट दशकात शेती उत्पादन वाढीचा वेग किती होता ते दाखविण्यासाठी या निर्देशांकांचाच मी उपयोग करणार आहे.

१९५२–५३ ते १९६१–६२ या काळात भारतातील शेती-उत्पादन हे प्रतिवर्षी सरळ दराने ( linear rate ) साधारणतः ३$\frac{१}{४}$ टक्क्याने वाढत आहे आणि चक्रवाढ दराने ३ टक्क्याने वाढत आहे. धान्याचे उत्पादन हे थोडेसे कमी प्रमाणात झालेले असून त्यातील वाढ चक्रवाढ दराने दरवर्षी २$\frac{१}{२}$ % पेक्षा थोडीशी कमी आहे; परंतु ही उणीव बिगर धान्य पिकात प्रतिवर्षी चक्रवाढ

दराने ४ टक्के झाल्याने भरून निघालेली आहे. याबाबत प्रादेशिक तफावत मात्र खूपच आहे. उदाहरणार्थ, पंजाबमध्ये शेती उत्पादन दरवर्षी ५ टक्के चक्रवाढ दराने वाढले आहे; मद्रासमध्ये वाढ ४½ टक्के दराने झालेली आहे; परन्तु ओरिसामध्ये जवळजवळ १ टक्का, आणि पश्चिम बंगालमध्ये १ टक्क्यापेक्षाही कमी दराने वाढ झालेली आहे.

देशातील सर्वांगीण दारिद्र्य आणि बेकारी यावर प्रभावी प्रहार व्हायचा असेल तर आर्थिक विकासाचा जो साकलिक वेग गाठायला पाहिजे तो गाठण्याच्या दृष्टीने शेती उत्पादनातील वाढीचे हे प्रमाण अगदीच अपुरे आहे यात शंका नाही. आत्मसंतोषाला येथे बिलकूल अवसर नाही. परंतु येथे हेही जाणून घेणे महत्त्वाचे आहे की, आतापर्यंत आपण जी प्रगती केलेली आहे ती इतर देशांच्या साधारण तुलनात्मक स्थितीतील प्रगतीपेक्षा फारशी कमी नाही. उदाहरणार्थ, जपानमध्ये १८७८ ते १९१२ या काळात शेतीतील एकूण उत्पादन केवळ १२० टक्क्यांनी वाढले. म्हणजेच दरवर्षी वाढीचा चक्रवाढ वेग २½ टक्क्यांपेक्षा कमी होता. त्यानंतरच्या ३० वर्षात वाढीचा वेग याहीपेक्षा कमी होता; १९०८–१९१२ ते १९३३–३७ या कालात उत्पादन केवळ ४० टक्क्यांनी वाढले. शेती उत्पादनात स्पृहणीय वाढ होण्यासाठी १९५० ते ६० च्या दरम्यान अनेक जमीनसुधारणाविषयक कायदे करावे लागले व शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी उद्योगांची झपाट्याने वाढ व्हावी लागली.*

उपलब्ध पुराव्यावरून असे दिसून येते की चीनमध्ये १९५२ पासून कृषि उत्पादनात झालेली वाढ भारतात झालेल्या वाढीपेक्षा फारशी जास्त नाही. गेल्या दशकातील चीनच्या आर्थिक विकासा-

---

*बिगरशेती व्यवसायांच्या वाढीचा उल्लेखनीय वेग व लोकसंख्या वाढीचा मर्यादित वेग यामुळे १९०० पासूनच जपानच्या शेतीवरील लोकसंख्येचा भार न वाढेल अशी प्रवृत्ती अर्थव्यवस्थेत निर्माण झाली होती हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

दा. क्र. 94930

विषयी इतकी कमी माहिती उपलब्ध आहे की शेती उत्पादनाबाबतचा ज्या प्रकारचा पुरावा उपलब्ध आहे त्याचा निर्देश करणे उपयुक्त होईल.

चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या एका प्रकाशनाप्रमाणे (राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी आखलेल्या द्वितीय पंचवार्षिक योजनेविषयी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या आठव्या [ १९५८–६२ ] अधिवेशनाच्या शिफारशी, पृष्ठ १८) क्रांतिपूर्व कालात देशातील धान्याच्या एकूण उत्पादनाने १९३६ साली १५ कोटी टनांचा उच्चांक गाठलेला होता. यामध्ये जवळ जवळ १ कोटी १० लाख टन सोयाबीन आणि ६० लाख टन बटाटचांचा समावेश आहे. चीनमधील शेतीविषयक आकडेवारीत प्रायः या दोन्ही गोष्टींचा अन्नधान्याचा भाग म्हणूनच समावेश केलेला असतो. १९३६ साली तांदुळाचे उत्पादन ५ कोटी ७० लक्ष टनांपेक्षा थोडेसे जास्त होते आणि गव्हाचे उत्पादन साधारणतः २ कोटी ३० लक्ष टन इतके होते. उरलेल्यात विविध प्रकारच्या भरड धान्याचा समावेश होता.

युद्धाचा परिणाम म्हणून आणि तदनुषंगिक अर्थव्यवस्थेतील शैथिल्यामुळे नंतरच्या वर्षात शेती उत्पादनात घट झाली आणि १९५१ मध्ये देखील ते युद्धपूर्वकालीन उच्चांकापेक्षा कमी होते. युद्धपूर्वकालीन उच्चांक ओलांडणे १९५२ पूर्वी कधीच शक्य झाले नाही. म्हणून भारताप्रमाणे चीनमध्ये झालेल्या शेतीविषयक प्रगतीचे मूल्यमापन करण्यास १९५२ हे वर्ष आधारभूत वर्ष म्हणून वापरणे अधिक चांगले. (वर उद्धृत केलेल्या आणि खालील परिच्छेदामध्ये दिलेल्या प्रमाणभूत आकडेवारीसाठी १९४९ सालातील चिनी सरकारचे प्रकाशन 'टेन ग्रेट इयर्स', पृष्ठ ११९ पाहा.)

१९३६ मधील १३ कोटी ९० लाख टन व १९५२ मधील १५ कोटी ४० लाख टनांपेक्षा थोडचाशा अधिक उत्पादनाशी तुलना करता १९५७ मध्ये अन्नधान्याचे एकूण उत्पादन (सोयाबीन

वगळून पण बटाटे धरून,) १८ कोटी ५० लाख टनापर्यंत गेले होते. १९५८ सालच्या "प्रचंड झेपे" चा (The Great Leap Forward) कार्यक्रम या भ्रममूलक कल्पनेचा बोजवारा उडाल्यावर सर्व आकडेवारी जवळजवळ दडपून टाकण्यात आलेली आहे आणि म्हणून नंतरची प्रमाणित माहिती उपलब्ध नाही. परंतु एडगर स्नो यांनी (चिनी सरकारने नियोजिलेल्या भेटीनंतर) साधार व्यक्त केलेल्या अंदाजाप्रमाणे १९६० मध्ये अन्नधान्याचे एकूण उत्पादन १५ कोटी २० लाख टन झालेले आहे. (पाहा–एड्गर स्नो लिखित 'द ऑदर साइड ऑफ द रिव्हर', पृष्ठ ६२४.) चीनमध्ये गेल्या दशकात हे वर्ष सर्वात वाईट असावे. १९६३ व ६४ मधील पीकपाणी फारच चांगले झाले आहे असे चीनला अगदी अलीकडे भेट देणाऱ्या लोकांना सांगण्यात आले आहे. १९६४ मधील कृषि उत्पादन १९५७ सालातील उत्पादनापेक्षा १० टक्क्यांनी अधिक आहे असे सांगण्यात येते. उत्पादनाचा हा अंदाज बरोबर असेल तर १९६४ मधील उत्पादन हे साधारणतः २० कोटी ४० लाख टन असावे. म्हणजेच १९५२ मधील उत्पादनापेक्षा साधारणतः एक तृतीयांशानेच ते अधिक आहे. १९५१ मधील उत्पादन (म्हणजे १३ कोटी ५० लाख टन) जर तुलनेस मूळ आधार म्हणून धरले तर असे दिसून येईल की, या काळात भारतात झालेल्या अन्नधान्याच्या उत्पादनाच्या वाढीच्या दरापेक्षा चीनमध्ये अधिक दराने वाढ होऊ शकली नाही.

तथापि दर एकरी उत्पादनाच्या बाबतीत मात्र जपान आणि चीन या देशांनी अधिक प्रगती केलेली आहे. या काळाच्या सुरुवातीपासूनच त्यांची दर एकरी उत्पादनक्षमता अधिक होती हे खरे; पण त्यानंतरची शेती उत्पादनातील वाढ ही दर एकरी उत्पादनक्षमता वाढल्यामुळेच झालेली आहे असे दिसते. भारतात मात्र गेल्या दशकात वाढलेल्या उत्पादनाचा बराचसा भाग हा उत्पादनाचे क्षेत्र वाढविल्यामुळे वाढलेला आहे आणि फारच थोडी वाढ दर एकरी उत्पादनक्षमता वाढल्याने झालेली आहे. लागवडी-

खाली आणता येणारे क्षेत्र वाढविण्याची शक्यता मर्यादित असल्यामुळे दर एकरी उत्पादन योग्य प्रमाणात वाढले तरच केवळ कृषि उत्पादन वेगाने वाढू शकेल आणि म्हणूनच भारतात या गोष्टीकडे अधिक लक्ष देण्याची नितान्त आवश्यकता आहे.

जमिनीची उत्पादनक्षमता वाढवावयाची म्हणजे श्रम आणि खतपाणी यांचा अधिक उपयोग करण्याबरोबरच हे सर्व करणे शेतकऱ्याला फायदेशीर ठरेल अशी स्थिती असली पाहिजे, तरच शेतकऱ्याला उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन मिळेल. या संदर्भात किंमतींचे काय स्थान आहे याची मागेच चर्चा केली आहे. हक्क-संबंध हाही शेतीउत्पादन समस्येचा महत्त्वाचा भाग आहे.

या बाबतीत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या वीस वर्षांत जमीनविषयक अनेक कायदे भारतात झाले असले, आणि थोड्या प्रमाणात त्यांची अंमलबजावणीही होत असली, तरीही लागवडी-खाली असलेल्या एकूण क्षेत्राचा बराच मोठा भाग अजूनही कूळकसणुकीखाली आहे, आणि सर्वसाधारणपणे कायदेशीर संकेताच्या अत्युच्च मर्यादेपेक्षाही कितीतरी अधिक खंड घेतला जातो. पुष्कळ राज्यात वस्तुतः जमीनविषयक कायद्यांचा परिणाम कूळकसणूक छुपेपणाने चालण्यात व खंड वाढण्यात आला आहे; कारण कुळांना कसल्याही प्रकारचे हक्क मिळू नयेत असा जमीनमालकांचा प्रयत्न आहे. शेतीवर असलेल्या लोकसंख्येच्या अफाट दडपणामुळे भूमिहीन शेतकऱ्यांवर अशा जुलमी अटी लादणे जमीनमालकांना शक्य होते आणि खेडेगावातील सामाजिक स्थिती आणि राजकारण यामुळे कायद्याने कागदोपत्री दिलेले अधिकार प्रत्यक्षात मिळविण्यासाठी झगडणे या वर्गांना शक्य होत नाही.

शेतमजुरांच्या स्थितीविषयी झालेल्या दुसऱ्या चौकशीत काही विदारक सत्ये प्रकाशात आली आहेत. भूमिहीन शेतमजूर कुटुंबांची १९५०–५१ मधील संख्या १ कोटी ७५ लक्षांवरून १९५६–५७ आपाततः १ कोटी ६३ लक्षांपर्यंत घटली असली

तरी याच वर्गात वर्णिलेल्या ‘संलग्न शेतमजूर’ अशा कुटुंबांचे शेकडा प्रमाण ९·७ वरून २६·६ पर्यंत वाढलेले आहे. ‘संलग्न शेतमजूरा’ची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे : ‘जे शेतावरील नित्याची कामे वर्षभर करतात आणि पुष्कळ वेळेला तीन महिन्यांच्या, सहा महिन्यांच्या वा वर्षाच्या तोंडी अगर लेखी कराराने ज्यांची नेमणूक केली जाते असे मजूर.’ शेतकरी कुटुंब आणि भूमिहीन शेतमजूर कुटुंब यातील फरक ठरविण्याच्या निकषात पहिल्या आणि दुसऱ्या चौकशीच्या वेळी बदल करण्यात आला असल्यामुळे या सहा वर्षांत शेतमजुरांच्या कुटुंबांच्या एकूण संख्येत जो घट नोंदविली गेलेली आहे ती खरीच असल्याचे निश्चित सांगता येत नाही. परंतु संलग्न शेतमजुरांच्या कुटुंबांच्या संख्येत जी वाढ दिसून येते तिचा अर्थ असा की, गेल्या दशकाच्या मध्याला कुळांना किंवा बटाईदारांना ‘शेतमजूर’ म्हणून संबोधण्याचा प्रघात जमीनमालकांनी पाडला.

भारतात लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या केवळ $\frac{1}{3}$ भागातच भरवशाचा पाऊस पडतो अथवा पाणीपुरवठ्याची व्यवस्था आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या फारच अधिक असल्यामुळे लोकांची प्रवृत्ती अधिक सुपीक प्रदेशात जाण्याकडे आहे. परिणामतः इतर भागांपेक्षा या भागातील लोकसंख्येची घनता जास्त झाली आहे. इतकेच नव्हे तर भूमिहीन शेतमजूर खंड कितीही पातळीपर्यंत वाढवून द्यायला तयार झाले. याचा परिणाम मात्र असा झाला आहे की, सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीने जेथे पाणी पुरवठ्याच्या योजना उपलब्ध आहेत व इतर नैसर्गिक परिस्थिती अधिक अनुकूल आहे अशा प्रदेशात खते, चांगले बी-बियाणे वगैरेसारख्या उत्पादनवाढीस साह्यभूत ठरणाऱ्या घटकांच्या वापरास अधिक प्रोत्साहन देऊन आणि त्यांच्या वापरावर अधिक लक्ष केंद्रित करून उत्पादनक्षमता वाढविणे ही मोक्याची संधि असली तरी, या परिसरात आकारल्या जाणाऱ्या अधिक खंडामुळे कूळ म्हणून जमीन कसणाऱ्यांचा योग्य प्रमाणात उत्पादक घटकांचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
४४३८८. २५ निबंध
१९९३. ११/३/५

वापर करण्याच्या बाबतीत मात्र फारच उत्साहभंग होतो.

देशातील अधिक सुपीक आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांनी युक्त अशा प्रदेशात एकूण उत्पादनाच्या ५० ते ६० टक्के, किंवा क्वचित त्याहूनही अधिक, खंड आकारला जातो; इतकेच नव्हे तर, बटाईची पद्धत अस्तित्वात असल्यामुळे आणि परिणामतः वहिवाटीच्या असुरक्षिततेमुळे खंड हा वेळोवेळी बदलत जातो. श्री. वुल्फ लेड्जीन्स्की यांनी नियोजन मंडळाला नुकत्याच सादर केलेल्या एका निवेदनाप्रमाणे (दुर्दैवाने ते निवेदन प्रसिद्ध करण्याची जरुरी नियोजन मंडळास अजूनही वाटली नाही) देशातील कित्येक भागात भूधारण क्षेत्राची अजून पूर्ण नोंदहि झालेली नाही. त्यामुळे बटाईविषयक बहुतेक करार तोंडी होतात व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कारभारयंत्रणेची काहीही व्यवस्था करता येत नाही. अशा परिस्थितीत ज्या कायद्यांची अंमलबजावणी करता येणे शक्य नाही, आणि म्हणूनच जे केवळ कागदी घोडे ठरतील, अशा तऱ्हेचे 'क्रांतिकारक' कायदे पास करण्यापेक्षा कडक देखरेखीखाली जमीनजुमल्याची नोंद करणे, खंडाचे प्रमाण रोख पैशात ठरविणे, आणि खेड्यातील पोस्ट ऑफिससारख्या सरकारच्या प्रातिनिधिक संस्थेमार्फतच तो देण्याघेण्याची योजना सुरू करणे, अशा कांही भरीव उपायांवर भर देणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

आजची सरकारची प्रवृत्ती मात्र जमिनीतील हक्कसंबंधाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून केवळ तंत्रशाही (technocratic) भूमिका घ्यायची व रासायनिक किंवा कंपोस्ट खतांचा व चांगल्या बियाण्यांचा वाढता वापर यावर भर द्यायचा अशी झालेली दिसते. आज जमिनीच्या मालकी हक्काच्या प्रश्नाबद्दल सरकारी घोषणापत्रात उल्लेख केला जातो, तो तसा उलेख न केल्यास संभवणाऱ्या टीकेपासून कातडी बचावण्यासाठीच असतो. देशातील राजकीय प्रवाहांचेच हे प्रतिबिंब होय. ग्रामीण भागात ज्यांच्यावर काँग्रेस पक्ष अवलंबून आहे अशा शेतजमिनीत हितसंबंध असलेल्या वरिष्ठ

वर्गांची प्रवृत्ती सध्याचे हक्कसंबंध अबाधित ठेवण्याकडे आणि समाजविकास व शेतीविस्तार योजनांतर्फे देण्यात येणाऱ्या योजनांचा फायदा घेऊन ग्रामीण भागातील आपले आर्थिक आणि राजकीय स्थान भक्कम करण्याकडेच आहे. आणि म्हणून शेतीविकास व छोटया शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी हक्कसंबंध सुधारण्याची गरज यांना काँग्रेस पक्ष सभासमारंभात केवळ शाब्दिक पाठिंबा देत असतो.

शेतीच्या क्षेत्रात परिणामकारक उपाययोजना निकडीने करण्याची अनिच्छा झाकण्याचा एक राजकीय मार्ग म्हणजे ज्यांची कधीच अंमलबजावणी होणे शक्य नाही अशा आत्यंतिक घोषणांचा उद्घोष करीत राहणे होय. काँग्रेस पक्ष आणि सरकार हे दोघेही ज्याला अगदी चिकटून बसले आहेत अशी, जमीनधारणेवरील कमाल मर्यादा आणि सहकारी शेती ही अशा पोकळ घोषणांची अगदी उत्तम उदाहरणे होत. आजकाल सहकारी संस्था म्हणजे राष्ट्रीय विकास योजनांमुळे उपलब्ध झालेल्या सोयी सुलभ मार्गाने आपल्या पदरात पाडून घेण्याची वडया शेतकऱ्यांच्या हातातील साधने झाली आहेत आणि त्यामुळे सुयोग्य राजकीय चौकटीत जिला भरीव कामगिरी करून दाखविणे शक्य झाले असते ती संबंध सहकारी चळवळच आज बदनाम झाली आहे.

म्हणून, आज जर कशाची नितांत आवश्यकता असेल तर ती, हक्कसंबंधात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याची घोषणा करणाऱ्या कायद्यांची संख्या वाढविण्याची नाही, तर वेगवान शेती विकासासाठी कांही वेचक भरीव उपाययोजनांची आखणी करणे व त्यांची कठोरपणे अम्मलबजावणी करण्याचा निर्धार करणे ही आहे. यापेक्षा अधिक काही करावे किंवा करता येणे शक्य आहे अशी अपेक्षा करणे हा शुद्ध पोरकटपणा ठरेल. वर सुचविलेल्या प्रकारचे कमीतकमी उपाय अंमलात आणावयाचे ठरविले तरीदेखील त्यास कितीतरी विरोध होण्याची शक्यता आहे. आजच्या राज्यकर्त्यांत दिसून येते त्यापेक्षा कितीतरी अधिक धाडस व

डोळसपणाची त्यासाठी गरज आहे. आज हे गुण अभावाने दिसत असले तरी, व्यावहारिक राजकारणाच्या मर्यादेतही प्रकट होऊ शकतील असेच ते आहेत.

शेतीच्या बाबतीत केवळ तंत्रशाही धोरण स्वीकारल्यामुळे उत्पादन वाढणारच नाही असे मुळीच नाही. किंबहुना गेल्या दहा वर्षांमध्ये शेतीत जी प्रगती झाली तिचे श्रेय त्या दृष्टिकोनाकडेच जाते. पण पाणीपुरवठा, खते वगैरेंसारख्या महाग घटकांचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचा असेल तर केवळ तंत्रशाही दृष्टि-कोनाने भागणार नाही. मद्रास राज्यातील तंजावर जिल्ह्यात –ज्याला दक्षिणेकडील भाताचे कोठार समजले जाते–करण्यात आलेल्या एका शेती व्यवस्थापन अध्ययनात असे दिसून आले आहे की, खंडाचा दर एकूण उत्पादनाच्या साठ टक्के इतका भयानक असल्याने तांत्रिकदृष्टचा पाणी, खते वगैरे घटकांचे जे आदर्श प्रमाण आहे त्याच्या एक तृतियांशानेच त्या घटकांचा वापर करणे कुळांना परवडते; परिणामतः उत्पादनात फार कमी वाढ होते. पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने सुयोग्य असलेली जमीन एकूण लागवडीखालील जमिनीच्या एक तृतियांशापेक्षा कमी आहे हे लक्षात घेता, अधिक सुपीक जमिनीचा अधिक कौशल्याने उपयोग करून घेतला नाही तर शेती उत्पादनाच्या वाढीचा वेग गेल्या दशकातील तीन टक्क्यांवरून पांच टक्क्यापर्यंत वाढविणे शक्य होणार नाही. वाढीचा हा वेग जर लवकर गाठला नाही तर त्याचे परिणाम अतिशय घातक होतील.

उत्पादकांचा प्रतिसाद वाढेल अशा पद्धतीने मोजके संस्थात्मक बदल घडवून आणले व आवश्यक त्या उत्पादक घटकांचा पुरवठा पुरेशा प्रमाणात केला तर आवश्यक तितका शेती उत्पादन वाढीचा वेग अल्पावकाशात प्राप्त करणे मुळीच कठीण नाही. यात जर आपणाला अपयश आले तर त्याची कारणे आर्थिक व तांत्रिक असणार नाहीत, राजकीय असतील.

* * *

व्याख्यान दुसरे

# औद्योगिक विकास आणि परदेशी मदत

गेल्या काही वर्षांत भारतात आधुनिक औद्योगिक क्षेत्रात विकासाचा उल्लेखनीय वेग निर्माण झालेला आहे. १९५६ हे वर्ष आधारभूत मानून ठरविण्यात आलेल्या औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकाप्रमाणे १९५१ ते ५५ या काळातील औद्योगिक विकासाचा चक्रवाढ वेग दरवर्षी ५$\frac{३}{४}$ टक्के होता, व दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीपासून तो ७$\frac{१}{२}$ टक्क्यांपर्यंत वाढला. तिसऱ्या योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत औद्योगिक विकासाचा चक्रवाढ वेग प्रतिवर्षी सुमारे आठ टक्के होता.

वस्तुत: आधुनिक औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात प्रस्थापित झालेला विकासाचा वेग हा वरील निर्देशांकापेक्षा काहीसा अधिक आहे. स्वातंत्र्यपूर्व कालातील कापड, ताग, चहा आणि साखर ( त्यांना आपण 'जुने' उद्योग म्हणू या ) या चार प्रमुख उद्योगांनी तुलनात्मकदृष्टचा १९५५ नंतर कमी विकास दर्शविला आहे; परंतु या उद्योगांना अधिकृत निर्देशांकात १०० पैकी ५० गुण वजन म्हणून देण्यात आलेले आहेत. इतर काही उद्योगांचा, विशेषत: रासायनिक, धातूंचे व इंजीनियरिंग या उद्योगांचा—ज्या उद्योगात भांडवलाची मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झालेली आहे—विकास अधिक वेगाने झालेला आहे. पण या उद्योगांचे वाढलेले महत्त्व अधिकृत निर्देशांकात त्यांना दिलेल्या वजनातून पुरेशा प्रमाणात व्यक्त होत नाही.

जुन्या आणि नव्या उद्योगांच्या विकासाच्या वाढीतील हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे. भविष्यकालासाठी यातून काही महत्त्वाचे अर्थ व्यक्त होतात. १९५१ ते ६३ या कालखंडात 'जुने' उद्योग प्रतिवर्षी तीन टक्के चक्रवाढ वेगाने वाढले. याच

काळात ‘ नवे ’ उद्योग प्रतिवर्षी सुमारे दहा टक्के चक्रवाढ वेगाने वृद्धिंगत झाले. शिवाय, ‘ जुन्या ’ उद्योगांचा पहिल्या पंचवार्षिक योजनेत विकासाचा वेग प्रतिवर्षी ४½ टक्के होता, तो १९५६ नंतर २½ टक्क्यांपर्यंत घसरला. या उलट नव्या उद्योगांच्या विकासाचा वेग १९५१ ते ५५ मधील प्रतिवर्षी ७½ टक्क्यांवरून १९५५ ते ६३ या काळात ११¼ टक्क्यापर्यंत वाढला.

जुन्या उद्योगांतील विकासाचा वेग मंद का, याची कारणे उघड आहेत. या उद्योगांपैकी कापडधंद्यास जवळ जवळ दोन-तृतीयांश वजन देण्यात येते. ग्रामीण आणि शहरी या दोन्हीही आर्थिक क्षेत्रातील विविध कुटुंब पाहाणीमधून असे आढळून आले आहे की, एकूण उपभोगावर कुटुंबाचा ज्या प्रमाणात खर्च वाढतो त्याच प्रमाणात कपड्यालत्त्यावरचा खर्च वाढतो. याचा अर्थ असा की, जर एकूण उपभोग खर्च मुळातच प्रतिवर्षी तीन टक्क्यांच्या आसपास वाढत असला, तर कुटुंबाची कापडाची मागणी त्यापेक्षा अधिक वेगाने वाढू शकणार नाही. शिवाय, भारतीय कापड-मालास परदेशी बाजारपेठेत तीव्र स्पर्धेस तोंड द्यावे लागत असल्यामुळे कापडधंद्याच्या विकासावर देशांतर्गत मागणीमुळे मर्यादा पडते. ज्या प्रमाणात अंतर्गत मागणी वाढेल, त्याच प्रमाणात कापडधंदा वाढेल. मागणी कमी वाढत असल्यामुळे धंदाही कमी वाढणार. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात प्रति माणशी उपलब्ध असणारे कापड कमी झाल्यामुळे महायुद्ध संपताच ही साठलेली मागणी सुरुवातीच्या काही वर्षांत पुरी करायला हवी होती. जसजसा कापसाचा पुरवठा पुरेशा प्रमाणात पहिल्या पंच-वार्षिक योजनेच्या काळात होऊ लागला, तसतसा कापड उत्पादनाचा वेग बऱ्याच झपाट्याने वाढला. परंतु, एकदा साठलेली मागणी पुरी झाल्यावर, विकासाचा वेग स्वाभाविकपणेच मंदावला. यावरून असे दिसते की, कापडधंद्यातील उत्पादनाचा मंदावलेला वेग हा भांडवल गुंतवणूकीच्या अभावाचा नसून अपुऱ्या मागणीचा परिणाम आहे. वस्तुतः, या उद्योगात अजूनही वापरात न आलेली

उत्पादनक्षमता दृष्टीस पडते आणि बाजारातही कापडाचा तुटवडा दिसत नाही.

अशीच काहीशी कारणे तागाच्या आणि चहाच्या उद्योगांबाबत आहेत; फरक इतकाच की, या उद्योगांत परदेशी बाजारपेठेतील मागणी आणि स्पर्धा यांच्याच मुख्यतः मर्यादा पडतात. 'जुन्या' उद्योग समूहातील फक्त साखर धंद्यातच उत्पादनाचा काहीसा अधिक वेग आढळून येतो. गेल्या काही वर्षात परदेशी बाजारपेठांत भारतीय साखरेचा शिरकाव झाला आहे, आणि देशांतर्गत मागणीही वाढते आहे. ही मुख्य कारणे साखरधंद्यातील उत्पादनवाढीस जबाबदार आहेत. ग्रामीण आणि शहरी जीवनात साखरेच्या उपभोगात बराच फरक आढळून येतो. ग्रामीण क्षेत्रातील शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली की, गुळाऐवजी साखरेचा वापर वाढू लागतो; मागणीही वाढते. याचा अर्थ असा की, साखर-बाजारात आज दिसणारी टंचाई ही भांडवलाच्या अपुऱ्या गुंतवणुकीमुळे नसून उसाच्या अपूऱ्या पुरवठ्यामुळे आहे.

वरील चारही उद्योग—ज्यांना आपण 'जुना उद्योग समूह' असे संबोधतो—हे शेतीवर आधारलेले आहेत असे दिसून येते. शेतीवर आधारलेले या अर्थाने, की, या उद्योगांना आपल्या मूलभूत कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी शेतीवर अवलंबून राहावे लागते. साहजिकच, शेती उत्पादनातील वाढीचा वेग मंदावला की, या उद्योगांवर परिणाम होऊन त्यांच्या विकासावर मर्यादा पडतात. यामुळे या उद्योगांची विकासाची क्षमता आणि वेग केवळ त्यांना असलेल्या मागणीच्या वाढीवर अवलंबून नसून शेती विकासाच्या वेगावर अवलंबून राहते.

रासायनिक, धातूंचे व इंजिनियरिंग उद्योग (ज्यांना आपण 'नवा उद्योग समूह' म्हणून संबोधतो) त्या प्रमाणात वरील प्रकारच्या मर्यादांनी बांधले गेलेले नाहीत. त्यांच्या उत्पादनासाठी असलेली मागणी ही मुख्यतः संपूर्ण अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याच्या व्यापक प्रक्रियेतून उद्भवलेली असते. आणि, जो देश

जगात सर्वात मागासलेला आहे त्या देशासाठी तर, या विकासाला अमर्याद वाव असतो असे म्हणावे लागेल. हे उद्योग शेतीवर त्यांच्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी अवलंबून नसल्यामुळे त्यांचा विकास बहुतांशी स्वतंत्रपणे साधतो. मुख्यतः वरील कारणांमुळे जे उद्योग 'नव्या' उद्योगसमूहात मोडतात त्यांची प्रगती 'जुन्या' उद्योगसमूहापेक्षा अधिक झालेली आहे. आणि भविष्यात विकासाचा वेग वाढविताना मुख्यतः या उद्योगांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भांडवलाची कमतरता हीच प्रमुख मर्यादा (bottleneck) या उद्योगांच्या त्वरित व अखंड विकासाआड येते, कारण या उद्योगात फार मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करावी लागते.

या क्षेत्रातील उद्योगांना बऱ्याचदा 'जड' (heavy) उद्योगधंदे असे संबोधले जाते. याचा अर्थ फारसा स्पष्ट नाही; परंतु या संबोधनात बहुधा अभिप्रेत असणारा अर्थ म्हणजे, या उद्योगातून प्रत्यक्ष निर्माण होणारे उत्पादन आणि दिला जाणारा रोजगार यांच्या तुलनेने त्यात गुंतवावयाच्या भांडवलाची गरज बरीच मोठी असते हा होय. येथे एक गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे. रासायनिक, धातूंचे व इंजिनियरिंग हे उद्योग मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीच्या पद्धतीने चालवावे लागतात व त्यामुळे त्यात अधिक भांडवल गुंतवणूक करावी लागत असली आणि त्यामधील रोजगारीचे प्रमाण कमी असले तरी, या उद्योगांवरच असे अनेक उद्योग अवलंबून असतात की, ज्यांना कमी भांडवल लागते व जे अधिक रोजगार पुरवितात. हातमाग, हस्तोद्योग वगैरे सारख्या परंपरागत चालत आलेल्या छोट्या उद्योगांची वेगवान विकासाची क्षमता ही आधुनिक उत्पादन तंत्र वापरणाऱ्या व मोठ्या प्रमाणावर चालविल्या जाणाऱ्या उद्योगांशी जोडलेल्या लघु उद्योगांच्या मानाने कमी असते. म्हणून रोजगारी वाढविण्याच्या दृष्टीने या दुसऱ्या प्रकारच्या उद्योगांवर भर द्यायला हवा. या लघु उद्योगांना प्रतिमाणशी कमी भांडवल लागते. तेव्हा,

भांडवलाधारित जड उद्योगांपेक्षां त्यांना प्राधान्य द्यावे असे म्हणणे चुकीचे आहे. या लघु उद्योगांचा स्वतंत्रपणे, त्यांच्या पुरताच विचार करणे योग्य नाही. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेले लघु-उद्योग, त्यांना लागणारा पुरवठा—जो बहुतांशी मोठ्या रासायनिक, धातूंच्या व इंजिनियरिंग उद्योगांमुळे होऊ शकतो—पुरेसा झाला तरच झपाट्याने वाढतात. या वस्तुस्थितीकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते. भारतातील अलीकडचा विविध क्षेत्रातील असा अनुभव आहे की, हा पुरवठा पुरेसा होत असला तर, अवलंबित लघु उद्योग हे वेगाने विकसित होतात. शिवाय ते पुरेसे कार्यक्षम असतात. आणि पारंपरिक उद्योगांना लागणारे संरक्षणही या उद्योगांना देण्याची आवश्यकता भासत नाही.

'नव्या' उद्योगसमूहात मोडणाऱ्या उद्योगांचा विकास आतापर्यंत ज्या वेगाने होत आहे तो वेग कायम राहिला तर, एकूण औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा वेग दरवर्षी १० टक्क्यांपर्यंत नेणे सहज शक्य होईल. आधुनिक मोठे उद्योगधंदे सध्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी एकअष्टमांश भाग देतात. ( दहा वर्षांपूर्वी हे प्रमाण एक सोळांश होते. ) या क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ज्या प्रमाणात वाढत जाईल त्या प्रमाणात त्या उद्योगांच्या विकासाच्या वेगाचा एकूण अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या वेगावर अधिकाधिक परिणाम होत जाईल.

आधुनिक मोठे कारखानदारी उद्योग प्रतिवर्षी सुमारे १० टक्के चक्रवाढ दराने वाढत असतील तर लघु उद्योगधंद्यातील उत्पादन प्रतिवर्षी ५ टक्क्यांनी वाढत असण्याची शक्यता आहे. हा विकासाचा वेग यापूर्वीच गाठला गेला असावा, यद्यपि राष्ट्रीय संपत्तीच्या सरकारी अंदाजात तो अद्यापही पुरेसा व्यक्त होत नाही. या बरोबरच शेती उत्पादन जर ५ टक्के वेगाने वाढविता आले (गेल्या दशकातील वेग प्रतिवर्षी ३ टक्के होता) , तर भारतातील एकूण वस्तु—उत्पादनाचा वेग प्रतिवर्षी ६ ते ७ टक्क्यांपर्यंत वाढू शकेल. जर वस्तु—उत्पादन या वेगाने वाढू शकले, तर सेवा-व्यव-

सायांपासूनचे उत्पन्न याहीपेक्षा अधिक वेगाने वाढेल असे गृहीत धरता येईल. आणखी आवश्यक असलेला थोडा अधिक प्रयत्न आपण निर्धाराने करू शकलो तर, येत्या काही वर्षात राष्ट्रीय उत्पन्नाच्या विकासाचा चक्रवाढ वेग प्रतिवर्षी ७ टक्केपर्यंत, किंवा थोडा अधिकही वाढविता येईल.

आपण आजपर्यंत केलेल्या विकासाचा विचार करता, उपरोक्त वेग गाठण्यासाठी शेती व उद्योग क्षेत्रात विकासाचा जो वेग साधावयाचा आहे तो आजपर्यंतच्या प्रत्यक्ष वेगापेक्षा फार अधिक नाही व तो आपल्या शक्तीबाहेर नक्कीच नाही. आजच्या आपल्या आर्थिक परिस्थितीतील अनुकूल व प्रतिकूल घटक कोणते, उणीवा काय आहेत, याची जाणीव ठेवून मोक्याच्या क्षेत्रात (उदा० शेती) अर्थव्यवस्थेची आवश्यक ती मोर्चेबंदी करणे व विकासाच्या या निर्णायक वाटचालीत कोठेही मंदपणा येऊ न देणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा त्याचे परिणाम भयानक होतील.

आर्थिक परिभाषेत बोलायचे तर, विकासाचे हे उच्चतर वेग गाठण्यासाठी एक महत्त्वाची अट म्हणजे भांडवल गुंतवणुकीचा वेग बराच वाढवावा लागेल. वस्तुनिर्मितीच्या उद्योगात भांडवल गुंतवणूक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केल्याशिवाय जलद गतीने विकास साधणे शक्य होणार नाही. याचा अर्थ असा की, परदेशी मदतीचा वास्तववादी अंदाज घेऊन, अंतर्गत बचतीचा वेग फार मोठ्या प्रमाणावर वाढविणे आवश्यक आहे. बचतीचे आणि गुंतवणुकीचे उपरोक्त उच्च दर आपणास गाठता येणे गेल्या काही वर्षांच्या अनुभवाच्या संदर्भात कितपत शक्य आहे, याचा विचार करायला हवा.

दुर्दैवाने भारतातील बचत आणि गुंतवणुकीचे विश्वासार्ह आणि खात्रीलायक अंदाज उपलब्ध नाहीत. त्यामुळे भूतकाळातील आपल्या प्रयत्नांचे मूल्यमापन करता येत नाही. आणि पर्यायाने पुढील काही वर्षांत काय घडू शकेल याचे अंदाज फारसा विश्वासाने बांधता येत नाहीत. शेती, लघु-उद्योगधंदे, वाहतूक,

राहण्याची घरे आणि वस्तूंचे साठे ( inventories ) या क्षेत्रातील खाजगी भांडवल गुंतवणूक किती आहे या विषयी उपलब्ध असलेली माहिती फार थोडी आहे. शेती क्षेत्रात होणारा दुरुस्ती वगैरेचा खर्च प्रत्यक्ष भांडवल गुंतवणुकीपासून कसा वेगळा करावयाचा यातही बऱ्या अडचणी आहेत. हीच गोष्ट ग्रामीण क्षेत्रातील घरांची आहे. या क्षेत्रांसंबंधी असलेले बहुतेक सर्व अंदाज हे अशा प्रकारे अपुऱ्या आणि जुजबी गृहीतांवर व अनुभवावर आधारलेले आहेत. आणि बचतीचे अंदाज हे भांडवल गुंतवणुकीच्या अंदाजावर आधारून व्यक्त केले जात असल्यामुळे दोन्ही बाबतीत सारख्याच मर्यादा पडतात.

या सर्व चर्चेत खात्रीलायक माहिती मिळते ती म्हणजे, सार्वजनिक क्षेत्रातील आणि खाजगी संघटित क्षेत्रातील भांडवल गुंतवणूक* आणि आयात-निर्यात व्यापारातील घटीमुळे अप्रत्यक्षपणे वापरली जाणारी परदेशी बचत, यांची. पंचवार्षिक योजनांत सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी संघटित क्षेत्र हेच भांडवल-गुंतवणुकीचे प्रमुख मार्ग असल्यामुळे १९५१ नंतर भारतातील जादा बचत आणि गुंतवणुकीसंबंधी सर्वसाधारण अंदाज व्यक्त करता येतात.

१९५१–५२ साली या दोन क्षेत्रात एकूण गुंतवणूक सुमारे रु. ५६५ कोटी झाली. ( रु. १६५ कोटींचे विविध वस्तूंचे साठे यातच अंतर्भूत आहेत. ) ही गुंतवणूक एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ५.६ टक्के होते. पण त्या साली आयात-निर्यात व्यापारा-

---

* नोव्हेंबर १९६३ मध्ये भरलेल्या 'फोर्थ इंडियन कॉन्फरन्स ऑन रिसर्च इन नॅशनल इन्कम' पुढे वाचलेल्या दोन निबंधांचा आधार येथे घेतला आहे. ते दोन निबंध असे : (१) जगदीश कुमार, अजितसिंग आणि ओ. पी. राजपाल, 'एस्टिमेटस ऑफ कॅपिटल फॉर्मेशन इन द पब्लिक अँड प्रायव्हेट कार्पोरेट सेक्टर्स' आणि (२) के. सी. शर्मा, 'फिनान्सिंग ऑफ कॅपिटल फॉर्मेशन इन द पब्लिक सेक्टर इन इंडिया : १९५१–५२ ते १९६०–६१.'

तील तूट रु. १७० कोटी होती. याचा अर्थ असा की, तितकी अंतर्गत गुंतवणूक परदेशी बचतीच्या सहाय्याने करण्यात आली. अशा रीतीने या दोन क्षेत्रातील १९५१–५२ सालात झालेल्या भांडवल गुंतवणुकीसाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ४ टक्के देशी बचतीची गरज पडली. १९५२–५३ सालातही देशी बचतीचे सुमारे हेच प्रमाण राहिले. पुढील काळातील तुलनेसाठी हे आकडे पायाभूत म्हणून मानता येतील.

१९६०–६१ साली सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी संघटित क्षेत्र मिळून एकूण गुंतवणूक सुमारे रु. १६९० कोटींची झाली. (यापैकी रु. २९० कोटींची वस्तुंच्या साठ्यात भर पडली.) या गुंतवणुकीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी सुमारे ११.९ टक्के असे प्रमाण पडत होते. याच वेळी आयात-निर्यात व्यापारातील तूट सुमारे रु. ४३८ कोटी पडत होती. हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.१ टक्के पडते. म्हणजे, १९६०–६१ साली या दोन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ८.८ टक्के एवढी देशी बचत वापरली गेली.

शेती, लघु-उद्योगधंदे, वाहतूक, राहण्याची घरे आणि वस्तूंचे साठे, या मध्ये १९६०–६१ साली भांडवलाच्या खाजगी गुंतवणुकीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण जवळ जवळ एका दशकापूर्वी असलेल्या प्रमाणाइतकेच असावे असे गृहीत धरणे वस्तुस्थितीला धरून होईल. बहुतांशी हे प्रमाण थोडेसे वाढले असण्याची शक्यताच अधिक आहे. याचा एक अर्थ असा की, गेल्या दशकात राष्ट्रीय उत्पन्नापैकीच्या देशी बचतीचे प्रमाण कमीतकमी ५ टक्क्यांनी वाढले असले पाहिजे. म्हणजे १९५१–५२ साली बचतीचा वेग राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के असला तर, १९६०–६१ मध्ये हे प्रमाण १० टक्क्यांवर आलेले असणार. जर १९५१–६२ मध्ये हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७ टक्के होते असे मानले, ( आणि शेती, लघु-उद्योग यातील खाजगी गुंतवणूक लक्षात घेता असे असण्याची शक्यता अधिक आहे, ) तर

१९६०–६१ मध्ये हे प्रमाण १२ टक्के झालेले असणार.

वरील अंदाज पुरेसे खरे असले तर, १९५०–५२ ते १९६०–६१ या दशकात देशी बचतीचे प्रतिवर्षी प्रमाण राष्ट्रीय उत्पन्न-वाढीच्या २० ते २५ टक्के इतके वाढलेले आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले एकूण देशी बचतीचे प्रमाण याहून पुष्कळ कमी होते असे जरी उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून सूचित होत असले, तरी बचतीचा सीमान्त वेग या दशकात वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या एक पंचमांश ते एक चतुर्थांशाहून कमी नव्हता असे दिसते.

बचतीचा हा वाढलेला वेग वस्तूंच्या भाववाढीमुळे साधला असेल का ? हा प्रश्न योग्य आहे. परंतु भाववाढीचा अभ्यास करता असे दिसते की, गेल्या दशकातील भाववाढ खूपच सीमित होती. १९६०–६१ मधील घाऊक किंमती १९५१–५२ पेक्षा १२ टक्क्यांनी व १९५२–५३ पेक्षा २५ टक्क्यांनी अधिक होत्या. ( १९६३–६४ पर्यंत भावांची पातळी १९६०–६१ च्या पातळी जवळच होती. ) म्हणजे, सर्वस्वी भाववाढीचा परिणाम होऊन उपभोगाचे प्रमाण सक्तीने खालावले व बचतीचा दर वेगाने वाढला असे काही म्हणता येणार नाही. अर्थात, या कालखंडात काहीशा वाढलेल्या भाववाढीने बचतीचे प्रमाण थोडेसे वाढले असणार हे कबूल करावे लागेल.

राष्ट्रीय उत्पन्नात होत असलेल्या वाढीतून सुमारे एक-पंचमांश ते एक-चतुर्थांश इतकी बचत भारतीय अर्थव्यवस्थेने करावी, हे वस्तुतः फारसे आश्चर्यजनक नाही. भारतात संपत्तीच्या मालकी हक्कामुळे मिळणाऱ्या उत्पन्नाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी जे प्रमाण आहे, ते साधारणपणे विकसित देशातील त्या प्रमाणाच्या बरोबरीने आहे; आणि ते उत्पन्न लोकसंख्येच्या फार थोड्या विभागाला लाभते. भारतातील उत्पन्नाची विभागणी इतर बहुतेक देशांपेक्षा अधिक विषम आहे. प्रत्यक्षात बचतीचा दर हा सरासरी दर डोई उत्पन्नावर अवलंबून नसून उत्पन्न

विभागणीच्या आकृति-बंधावर अवलंबून असतो. भारतातील उत्पन्न विभागणी ही बचतीचा सीमान्त वेग जास्त असण्याला अनुकूल अशीच आहे.

१९६३–६४ साली संरक्षण खर्च सुमारे रु. ५२५ कोटींनी अचानकपणे वाढला. राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ४ टक्के ही वाढ होती. पहिल्या व्याख्यानात स्पष्ट केल्याप्रमाणे, हा खर्च एकीकडे वाढलेला असताना दुसरीकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेग मंदावला होता. त्यामुळे बचतीचा सीमान्त वेग खूपच वाढण्याची गरज निर्माण झाली आणि त्यातून फार मोठी भाववाढ झाली. मात्र गेल्या वर्षातील अनुभवामुळे गेल्या दशकातील अधिक बचतीच्या क्षमतेचा अनुभव दृष्टीआड केला जाऊ नये.

१९६३–६४ मध्ये अचानक वाढलेल्या संरक्षण खर्चामुळे भाववाढ मोठ्या प्रमाणावर झाली असली तरी, त्याला एक उजळ बाजू आहे. अर्थव्यवस्थेतील भांडवल गुंतवणूक वाढविण्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू त्यातून स्पष्ट होतो. १९६३–६४ साली वाढलेल्या संरक्षण खर्चामुळे आयात–निर्यात व्यापारातील तूट वाढली नाही. त्या साली तूट फक्त रु. ४१४ कोटी राहिली. (१९६२–६३ साली ही तूट साधारणपणे इतकीच होती.) चालू, म्हणजे १९६४–६५, साली ही तूट सुमारे रु. ४०० कोटीच असेल. म्हणजे परकीय मदतीचा उपयोग करण्याचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाशी टक्केवारीच्या हिशोबाने गेल्या काही वर्षांत खालावले आहे. १९५७–५८ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४$\frac{३}{४}$ टक्के परदेशी मदत अर्थव्यवस्थेत सामावली गेली. १९६०–६१ मध्ये हे प्रमाण ३ टक्क्यांवर आले; आणि सध्या तर सुमारे २$\frac{१}{२}$ टक्के असे प्रमाण आहे.

आयात–निर्यात व्यापारातील चालू तूट फार नसण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, आपल्या निर्यात व्यापाराचे वाढते उत्पन्न. १९६०–६१ सालातील निर्यातीचा आकडा रु. ६३० कोटी होता; तो १९६१–६२ मध्ये ६६९ कोटी, १९६२–६३ साली

६८२ कोटी आणि १९६३–६४ मध्ये रु. ८०२ कोटींपर्यंत वाढत गेला. १९६४–६५ मधील निर्यातीचा आकडा उपलब्ध नाही, परंतु सध्याच्या वेगावरून ही वाढ रु. ८४५ कोटींपर्यंत होईल असे मानण्यास जागा आहे. म्हणजे उत्पादनातील कमतरता आणि उपलब्ध साधनसामग्रीवर मागणीचे वाढते दडपण या अडचणी असूनही तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ठरवून देण्यात आलेली निर्यात वाढीची लक्ष्ये जवळजवळ गाठली गेल्याचे दिसते.

ही निर्यातवाढ साधण्यासाठी योजलेल्या विविध उपाय-योजनांच्या योग्यतेविषयी शंका घेण्यास बरीच जागा आहे. उदाहरणार्थ, गेल्या काही वर्षात निर्यात व्यापाराला मदत (subsidies) देण्याची पद्धत बरीच गुंतागुंतीची होत गेली आहे. आणि कोणत्या नेमक्या वस्तूंना त्यांचा फायदा मिळतो, त्यातील फायदा देण्यायोग्य कोणत्या वस्तू, या मदतीसाठी होणारा खर्च कोणते उद्योगधंदे या ना त्या मार्गाने भरून देतात, आणि या सर्वांचा अर्थव्यवस्थेतील दुर्मिळ साधनसामग्रीच्या वापरावर कसा परिणाम होतो, याविषयी निश्चितपणे काही सांगता येत नाही. या सर्व शंका महत्त्वाच्या आहेत यात काही वाद नाही; आणि त्यांचा अधिक खुलासेवार विचारही व्हावयास हवा. तरीही आपण जी गोष्ट साध्य करू शकलो आहोत त्याचे महत्त्व विसरता कामा नये. विकास आणि संरक्षणखर्च यामुळे एकूण अर्थव्यवस्थेत जे ताण निर्माण झाले आहेत ते सहन करूनही, निर्यातवाढीची उद्दिष्टे साध्य करणे शक्य आहे; आणि निर्यात वस्तूंच्या किंमती इतक्या काही कमी ठेवाव्या लागत नाहीत, की ज्यामुळे वाढत्या निर्यातीचा फायदा शून्यवत् व्हावा. त्यामुळे निर्यातीचे उत्पन्न सतत वाढत राहील अशी प्रवृत्ती टिकविण्यासाठी परदेशी बाजारात स्पर्धा करू शकणाऱ्या किंमतीत निर्यात करता येतील अशा वस्तूंची विविधता व प्रमाण वाढविण्यासाठी काय काय करणे आवश्यक आहे, या दृष्टीने निरनिराळे पर्याय सुचविले पाहिजेत.

या सर्व चर्चेवरून एक मुद्दा स्पष्ट होतो, तो म्हणजे, एकूण

अर्थव्यवस्थेच्या विकासातून वाढलेल्या उत्पन्नाचा अधिकांश भाग बचत करून गुंतविण्याच्या दृष्टीने काय, किंवा वाढत्या विकास कार्यासाठी असणारी परदेशी चलनाची वाढती गरज भागविण्याच्या दृष्टीने काय, आजपर्यंतचा अनुभव जमेस धरता फार निराश होण्याचे कारण नाही. गेल्या दशकातील अर्थव्यवस्थेचा अनुभव लक्षात घेता असे दिसते पैकी, राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीपैकी सुमारे $\frac{1}{4}$ बचत केली जात आहे; आणि त्यासाठी भरमसाट भाववाढही होऊ द्यावी लागत नाही. आजवर केलेल्या भक्कम पायाभरणीमुळे निर्यातवाढीची क्षमताही वाढताना दिसत आहे. भविष्यातील विकासक्षमतेचा विचार करता, उत्पन्नवाढीचा वेग उंचावला आणि औद्योगिक पाया अधिक विस्तृत झाला की, आजवर जलद आर्थिक विकासाच्या मार्गात येणारी बचतीची आणि परदेशी चलनाची कमतरता यापुढे जाणवणार नाही. किंबहुना, शेतीविकासाचा वेग प्रतिवर्षी सुमारे ५ टक्के करता आला, राष्ट्रीय उत्पादनवाढीपैकी सुमारे $\frac{1}{4}$ बचत शिल्लक टाकली, आणि सध्याचा निर्यात–वाढीतील वेग सांभाळला, तर अर्थव्यवस्थेवर फारसा ताण पडू न देता परदेशी भांडवलाची गरज संपूर्णपणे मिटविता येईल.

मध्यंतरीच्या काळात परदेशी मदत चालू राहणे आवश्यक व उपयुक्त असले तरी, या मदतीच्या स्वरूपाविषयी आणि प्रमाणाविषयी बारकाईने खबरदारी घेणे फार आवश्यक आहे. विशिष्ट मोक्याच्या क्षेत्रांचा विकास साधण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेतील काही ताण अल्पकाळात तरी जाणवू नयेत यासाठी परदेशी मदत वापरण्याच्या भूमिकेतून पुढे अंतर्गतदृष्ट्या आवश्यक व शक्य असलेल्या उपाययोजना करण्याचे टाळण्यासाठी परदेशी मदतीचा आधार घेण्याची, परदेशी मदतीवर सतत अवलंबून राहण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. त्यामुळे संभवणाऱ्या अनिष्ट राजकीय परिणामाव्यतिरिक्त, प्रत्यक्ष आर्थिक विकासाची प्रक्रियाही त्यामुळे धोक्यात येण्याचा संभव असतो. भारताच्या विकासकार्यात

आता एक अशी अवस्था येऊन ठेपली आहे की, राजकीय आणि आर्थिक अशा दोन्ही दृष्टींनी, परदेशी मदतीचे अहितकारक परिणाम होऊ नयेत याची खबरदारी घेतली पाहिजे.

मागील व्याख्यानात आपण पाहिले की, पी. एल्. ४८० कराराप्रमाणे आयात केलेल्या गव्हामुळे गेल्या वर्षी भाववाढ रोखणे शक्य असूनही आपल्याला ते करता आले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, आधीच्या काळात या आयातीतून राखीव साठे उभारण्यात आले नाहीत आणि जेव्हा आवश्यकता नव्हती तेव्हा देखील अंतर्गत पुरवठ्याला पूरक म्हणून ही आयात वापरण्यात आली. त्यामुळे देशातील गव्हाच्या किमती फार खालच्या पातळीवर घसरल्या, आणि परिणामतः गव्हाच्या उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रेरणांवर प्रतिकूल परिणाम झाला. असले धोरण का अमलात आणले जात आहे, असा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे.

मुख्य कारण असे दिसते की, पी. एल्. ४८० कराराद्वारे होणारी आयात हा एक अंतर्गतदृष्ट्या रुपया चलनाच्या स्वरूपात साधन–सामग्रीची उभारणी करण्याचा एक सोयीस्कर मार्ग म्हणून स्वीकारण्यात येत आहे. ‘अर्थसंकल्पातील तूट’ कमी करण्याच्या निमित्ताने दरवर्षी आयात धान्याची खुल्या बाजारात विक्री करुन त्यापैकी मोठा भाग रुपयाच्या कर्जरोख्यात गुंतवावयाचा, हा मार्ग अवलंबिण्यात येत आहे. वित्तशास्त्रातील परंपरागत विचारसरणीच्या लोकांना त्यामुळे असे वाटते की, अर्थसंकल्पातील जमाखर्चाची तोंडमिळवणी– अन्यथा जमली नसती इतक्या चांगल्या रितीने– त्यामुळे साधता येते व एका महत्त्वाच्या धान्याची किमतही खालच्या पातळीवर रोखून धरता येते. पण या पद्धतीमुळे राखीव साठे उभे करणे शक्य असूनही ते होत नाही आणि जेव्हा अनपेक्षितपणे उपलब्ध पुरवठ्यावरील मागणीचा दबाव वाढतो (गेल्या वर्षी अनुभव आला त्याप्रमाणे) त्या वेळी सरकारी गुदामे रिकामी असतात. आणि मग परिस्थितीला तोंड

देता येत नाही व कोणत्याही आर्थिक उपाययोजनांची मात्रा भरमसाट भाववाढीविरुद्ध चालत नाही. जर या प्रश्नाचा अधिक तर्कशुद्ध विचार झाला असता तर, पी. एल्. ४८० कराराद्वारे थोड्या आयातीच्या आधारानेही गेल्या चार वर्षांत भावांतील स्थिरता साधता आली असती. परंतु, त्यासाठी भावांची स्थिरता ही बचतीचा सीमान्त वेग, भांडवल गुंतवणुकीतील वाढीचा दर, अंतर्गत उत्पादन वाढीचा दर, अंतर्गत साठे अशा विविध घटकांवर एकसमयावच्छेदेकरून अवलंबून असते, हे समजून घेणे आवश्यक होते. परदेशी मदत ज्या पद्धतीने दिली जाते त्यात दोष नसून, आपण त्या मदतीचा ज्या पद्धतीने विनियोग करतो त्यात दोष दडलेला आहे.

परदेशी चलनाची टंचाई दूर करण्यासाठी आपण परदेशी खाजगी भांडवलावरही कितपत आणि कोणत्या स्वरूपात अवलंबून असावे याचाही वरील पद्धतीने विचार केला पाहिजे. काही व्यक्ती असे सांगताना दिसतात की, भांडवलासाठी काढलेले परदेशी कर्ज ( मग ते परदेशी सरकार, आंतरराष्ट्रीय बँकासारख्या संस्था, अगर खाजगी भांडवलदार–कोणाकडूनही मिळविलेले असो ) हे एका विशिष्ट काळात मूळ मुद्दल व व्याजासकट परत करावे लागत असल्यामुळे परदेशी चलनाची बचत करण्याच्या दृष्टीने परदेशी कर्जापेक्षा परदेशी खाजगी भांडवल स्वीकारणे अधिक किफायतशीर आहे; कारण परदेशी खाजगी भाग भांडवलावर फक्त नफाच परदेशी चलनात परत करावा लागतो. आणि नफा पाठविण्यासाठी परदेशी चलनाची गरज देखील, हे उद्योग पुरेसे स्थिरस्थावर होऊन, वाढीस लागून मोठ्या प्रमाणावर नफा मिळवू लागले म्हणजेच मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. म्हणून, परदेशी खाजगी भांडवलास आकर्षक अशा अटी दाखवून त्यांचे मतपरिवर्तन करावयास हवे, व त्यांनी मिळविलेला नफाही त्यांनी परत भारतातच गुंतवावा असे वातावरण निर्माण करावे, असे या विचारसरणीच्या लोकांचे म्हणणे आहे.

या दृष्टीने धोरणात बदल केला तर, त्यामुळे संभवणाऱ्या राजकीय व इतर परिणामांचा विचार काही काळ बाजूस ठेवून, परदेशी हुंडणावळीच्या दृष्टीने या धोरणाचे कोणते फायदे होतील याचा विचार करू. परदेशी भांडवली कर्जापोटी दरवर्षी किती परदेशी चलन द्यावे लागेल हे, मुद्दलाची परतफेड सुरू करण्यासाठी दिला जाणारा सुरवातीचा सवलतीचा काळ, परतफेडीचा एकूण कालखंड, व्याजाचा आकारलेला दर, या बाबींवर अवलंबून असते; आणि परदेशी भांडवली कर्जाच्या तुलनेत परदेशी खाजगी भाग भांडवलामुळे परदेशी चलन जास्त द्यावे लागेल की कमी हे, ती भांडवल गुंतवणूक केव्हा नफा देऊ लागेल, नफा परत करण्याचा दर, नफ्याबरोबर भांडवलाची परतफेड करून घेण्याच्या अटी आणि अशा भांडवल गुंतवणुकीसोबतच्या करारांनुसार परदेशी चलनाच्या रूपाने पाठवाव्या लागणाऱ्या इतर आवश्यक रकमा ( उदा० परदेशी तज्ज्ञांचा पगार ) या गोष्टींवर अवलंबून राहील. थोडीशी आकडेमोड केली, आणि परदेशी खाजगी भांडवलाचा गेल्या काही वर्षांचा अनुभव जमेला धरला, तर दोन्हींपैकी कोणता पर्याय अधिक फायदेशीर आहे हे स्पष्ट होईल.

परत फेडीची सवलतीची मुदत दोन वर्षांची असली, परतफेडीचा कालखंड १७ वर्षांचा असला आणि व्याजाचा दर दरसाल ६ टक्के असला, तर एकूण भांडवली कर्जाच्या सुमारे १० टक्के रक्कम प्रतिवर्षी परतफेडीच्या कालखंडात परत करावी लागते.* परंतु अमेरिकेकडूनच मिळालेल्या बऱ्याच कर्जांचा व आंतरराष्ट्रीय बँकेकडून मिळालेल्या कर्जांचा व्याजाचा दर कमी असल्यामुळे व परतफेडीची मुदत मोठी असल्यामुळे, परत फेडीचे ओझे भांडवली कर्जाच्या सात टक्के इतके पडते. सोव्हिएट रशि-

* या परिच्छेदातील या व इतर आकडेवारीसाठी कोलंबिया युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ लॉ या संस्थेने तयार केलेल्या 'पब्लिक इंटरनॅशनल डेव्हलपमेंट फिनान्सिग इन इंडिया' ( जुलै १९६० ) सायक्लोस्टाईल अहवालाचे प १६ पहा.

याच्या बाबतीत कर्जाचा व व्याजाचा दर फक्त २½ टक्के असूनही, परतफेडीची मुदत बहुधा कमी असल्यामुळे (सुमारे १२ वर्षे) परतफेडीचे वार्षिक ओझे थोडे अधिक म्हणजे सुमारे ११½ टक्के पडते. फक्त फारच थोड्या कर्जांच्या बाबतीत– मुख्यतः जर्मनी व ब्रिटन यांच्या– व्याजाचा दर फार असून, परत फेडीची मुदतही फार कमी असल्यामुळे प्रतिवर्षी परतफेडीचे ओझे सुमारे वीस टक्के पडते. आजवर मिळालेल्या बहुतेक कर्जांबाबत परतफेडीचा भार मुख्यतः ७ ते १२ टक्क्यांच्या दरम्यान राहिलेला आहे.

याची तुलना परदेशी खाजगी भांडवल गुंतवणुकीमुळे द्याव्या लागणाऱ्या परकीय हुंडणावळीशी करता काय दिसून येते ते पाहू. उपलब्ध माहितीवरून काही ठाम निष्कर्ष काढता येत नाहीत. कारण अलीकडील परदेशी खाजगी भांडवलावर मिळविलेला नफा हा जुन्या भांडवलावरील नफ्यापासून अलग करता येत नाही आणि आणि नफ्याबरोबरच इतरही काही बाबींपोटी रकमांची परतफेड करावी लागते त्यांचे एकूण प्रमाण किती तेही स्पष्ट समजत नाही. रिझर्व बँकेने नुकताच अलिकडील काही वर्षांत परकीय सहाय्याने उभ्या केलेल्या रासायनिक उद्योगांतील सुमारे ८६ कंपन्यांचा अभ्यास केला आहे. त्या अभ्यासाचे निष्कर्ष उद्‌बोधक आहेत.*

या ८६ कंपन्यांपैकी ३५ कंपन्या परदेशी खाजगी भांडवलाच्या सहाय्याने उभारलेल्या आहेत. या ३५ कंपन्यांचे एकूण भरणा झालेले भांडवल १९६१–६२ साली सुमारे २६ कोटी आणि १९६२–६३ साली रु. ३० कोटी होते. यापैकी परदेशी खाजगी भांडवल १९६१–६२ मध्ये रु. १३ कोटी व १९६२–६३ मध्ये रु. १५ कोटी होते. त्यावरील डिव्हिडंड म्हणून एकूण परदेशी हुंडणावळीच्या स्वरूपात १९६१–६२ मध्ये सुमारे रु. ३·५ कोटी आणि १९६२–६३ मध्ये रु. २.१ कोटी दिले गेले होते. या

* पाहा : 'फॉरिन कोलॅबरेशन इन द केमिकल इंडस्ट्री,' रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिन, नोव्हेंबर १९६४.

पाठवणीच्या रकमांचे गुंतविलेल्या परदेशी खाजगी भांडवलाशी शेकडा सुमारे २० टक्के वार्षिक प्रमाण पडते.

एवढ्यावरच हे थांबत नाही. नफ्याच्या पाठवणी बरोबरच परकीय सहकार्याचा भाग म्हणून रॉयल्टी व तज्ज्ञांचा मेहनताना वगैरेंच्यासाठी परदेशी चलनात खर्च सोसावा लागतो. एकूण ८६ कंपन्यांचा मिळून हा खर्च वर्षाकाठी सुमारे रु.. १·२ कोटी झाला. ज्या ३५ कंपन्यांत परदेशी खाजगी भांडवल गुंतविलेले होते त्यांच्या बाबतीत प्रमाणाने ही रक्कम दरवर्षी रु. ०·५ कोटी येईल. म्हणजे गुंतविलेल्या परदेशी भांडवलाच्या एकूण जवळजवळ २४ टक्के रक्कम दर वर्षी परदेशी हुंडणावळीत द्यावी लागते. सरकारी पातळीवर किंवा आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत मिळालेल्या परदेशी भांडवली कर्जांपैकी कमीत कमी अनुकूल असलेल्या कर्जापेक्षा परदेशी खाजगी भांडवलाचा बोजा अधिक आहे हे स्पष्ट आहे.

१९५५ पासून दिलेल्या विविध सवलती आणि फायदेशीर अटी यांमुळे फार मोठ्या प्रमाणावर खाजगी परदेशी भांडवल आकर्षित होऊन परदेशी चलनाच्या आयातीत विशेष वाढ झाल्याचेही दिसत नाही. भारत सरकारच्या येण्यादेण्याचा (Assets and Liabilities) रिझर्व बँकेने प्रसिद्ध केलेला अगदी अलीकडचा पाहणी अहवाल पाहिला तर असे दिसते की, १९५५ ते ६१ या काळात परदेशी खाजगी भांडवलाची आयात केवळ रु. २११ कोटींचीच झाली; यापैकी रु. ८२ कोटी तर राखून ठेवलेल्या नफ्यापोटीच होते; म्हणजे परदेशी हुंडणावळीच्या रूपाने फक्त रु. १२९ कोटीचे भांडवल जमा झाले. याच काळात सुमारे रु. ७३ कोटी परदेशी खाजगी भांडवल परतफेडीमुळे कमी झाले. नफा, रॉयल्टी वगैरे कारणास्तव होणारी वार्षिक जावक लक्षात घेतली नाही तरीही, एकूण सहा वर्षात फक्त रु. ५६ कोटींचे परदेशी चलन खाजगी भांडवलाच्या मार्गाने उपलब्ध झाले; हे प्रमाण दर वर्षास सुमारे फक्त रु. १० कोटी पडते.

यात आश्चर्य वाटण्यासारखे फारसे काही नाही. महायुद्धानंतर झालेल्या परदेशी खाजगी भांडवल गुंतवणुकीचे जे विविध अभ्यास झालेले आहेत त्यावरून असे दिसते की, ५–६ वर्षांत नफ्याच्या रूपाने भांडवल भरून निघण्याची खात्री असली तरच खाजगी भांडवल परदेशांसाठी उपलब्ध होते, एरव्ही नाही. विकसनशील देशात झालेल्या परकीय खाजगी भांडवलाची गुंतवणूक ही मुख्यतः नफ्याची मोठ्या प्रमाणात पाठवणी केल्यानंतर राहिलेल्या नफ्याच्या फेरगुंतवणुकीमुळे झाली आहे.

इतके असूनही भारताच्या भावी विकासात परदेशी खाजगी भांडवलावर आधारून योजना आखाव्यात असा विचार अगदी वरिष्ठ सरकारी वर्तुळात एखादा गट मांडत असेल, तर मग त्याची कारणे आर्थिक नसून निव्वळ राजकीय आहेत असे समजण्यास हरकत नाही. या देशातील काही हितसंबंधांच्या दृष्टीने परदेशी खाजगी भांडवलाबाबत उदार दृष्टिकोन स्वीकारणे अनेक बाबतीत फायद्याचे आहे. परदेशी खाजगी भांडवलासाठी करयोजनेत भरघोस सूट व इतर सवलती एकदा द्यावयाचे ठरले, की मग 'समान वागणुकी'च्या तत्त्वाचा आग्रह धरून त्याच सवलती येथील खाजगी भांडवलाला मिळाव्या अशी मागणी करणे सोपे जाते. परदेशी कंपन्यांच्या सहकार्याने येथील भांडवलदारवर्गास त्या कंपन्यांच्या पेटंट्सचा व नावाचा उपयोग, अंतर्गत बाजारपेठेचा मोठा भाग हस्तगत करण्यास व कांही अंशी मक्तेदारी निर्माण करण्यासाठी करता येतो. आर्थिक मदत करण्याठी सरकारने निर्माण केलेल्या खास संस्था ( यापैकी काहींना पी. एल्. ४८० करारान्वये आयात केलेले धान्य विकून उपलब्ध झालेला पैसा मिळतो) परदेशी सहकार्याने उभारलेल्या उद्योगांना मदत देण्याबाबत विशेष उदार असतात. एकदा मोठ्या प्रमाणावर असे परदेशी खाजगी भांडवल देशात उभे झाले–मग ते नफा राखून त्याची फेरगुंतवणूक केल्यामुळे का होईना— कोणतेही सरकार खाजगी उद्योगांना न आवडणारी गोष्ट करण्यास भिऊ लागेल.

कारण, हे परदेशी भांडवल अचानक परत परदेशी न्यावयाचे असे या कंपन्यांनी ठरविल्यास देशाच्या आयातनिर्यातीवर एकदम विपरीत परिणाम होईल या भीतीने साहजिकच कोणत्याही सरकारचे हात बांधले जातील.

या चर्चेचा अर्थ असा नाही की, परदेशी भांडवल अगर तांत्रिक सहकार्य संपूर्णपणे निषिद्ध मानले जावे. काही वेळा ज्या उद्योगांमुळे अर्थव्यवस्थेत मोलाची भर पडू शकेल अशा उद्योगांसाठी विदेशी तांत्रिक व आर्थिक सहकार्य घेणे अपरिहार्य ठरते. अशावेळी राष्ट्रीय हिताबाबत पुरेशी दक्षता घेऊन बऱ्याच सवलती देणही योग्य होईल. अशी उदाहरणे थोडीच असणार. त्यापैकी प्रत्येकाच्या गुणदोषांचा स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेता येईल. तेवढ्यावरून सर्वच परदेशी खाजगी भांडवलाबाबत उदार दृष्टी स्वीकारलीच पाहिजे असा व्यापक आर्थिक सिद्धांत कोणी मांडू नये.

परदेशी चलनाची अडचण आपणास कमी करावयाची असल्यास आपण दीर्घमुदतीची कर्जे स्वीकारण्यावर भर द्यायला हवा, अगर कर्ज देणाऱ्या देशांबरोबर अशा वाटाघाटी करावयास हव्यात की, त्या देशांनी भारतीय मालाची आयात वाढवून भारताच्या निर्यातवाढीतून कर्जाची फेड सुकर करावी. परदेशी खाजगी भांडवलाबाबत ही अडचण प्रामुख्याने जाणवते. कारण परदेशी सहकार्याने उ ारलेल्या कारखान्यातील तयार झालेला माल इतर देशात पाठविणे कठीण जाते. आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे एकाच वेळी बऱ्याच देशांत हितसंबंध गुंतलेले असतात.

सोव्हिएट युनियनकडून मिळालेल्या कर्जाबाबतीत तेवढे चांगले परिणाम दिसतात; कारण त्यांच्याकडून मिळणारी मदत व्यापारवाढीशी निगडित झालेली आहे. जरी या कर्जामुळे सुमारे १२ टक्के परतफेडीचे ओझे पडत असले, तरी रशियन गटाला जाणाऱ्या मालाची निर्यातवाढ झपाट्याने झाल्यामुळे या कर्जाची परतफेड फारशी अडचण न भासता करता आली. वस्तुतः रशियाकडून

मिळालेले कर्ज व्यापारी उधारीच्या स्वरूपाचे असून ते व्यापार वाढविण्याशी बांधले गेलेले असते. याचा दोन्ही राष्ट्रांना फायदाच मिळतो. सोव्हिएट युनियनमध्ये भारतीय मालासाठी मोठी बाजारपेठ आहे. कारण त्यांची त्या देशाला गरज आहे आणि या मालाच्या बदल्यात भांडवल आणि यंत्रसामग्री मिळणे आपल्या हिताचे आहे. याच कारणासाठी चीन रशियाकडून बरीच मदत मिळवू शकला आणि कर्जाची परतफेडही थोड्या मुदतीत करू शकला.

रशियाखेरीज इतर देशांकडून मिळणारी मदत ही उदारपणे मिळाली असली तरी, पाश्चात्य देशांनी भारताची निर्यातवाढ होण्यास फारशी मदत केलेली नाही. किंबहुना, भारतीय मालाची त्यांच्या मालाशी त्यांच्या बाजारपेठेत स्पर्धा होऊ लागली की, ते देश भारताच्या निर्यातीवर बंधने घालण्याचाच प्रयत्न करतात. निर्यात व्यापारवृद्धीच्या दिशेने मंदगतीने होण्याऱ्या प्रगतीची कारणे समजून घ्यावीत; या देशातील प्रगतीशील उदारमतवादी व्यक्तींच्या व्यापारावरील निर्बंध दूर करण्याच्या प्रयत्नांसंबंधी सहानुभूती असायलाही हरकत नाही; पण परदेशी हुंडणावळीच्या स्वरूपात वाढत जाणारा पाश्चिमात्य परदेशी कर्जांच्या परतफेडीचा बोजा व त्यांतून निर्माण होणारे बिकट प्रश्न यांचा विसर पडू देता कामा नये. अशा देशांकडून कर्जे घेताना परतफेडीसाठी भरपूर दीर्घ मुदतीचा आग्रह (व्याजाचा दर कमी असला तरी ) धरणे आवश्यक आहे, कारण तसे झाले तरच परतफेडीचा ताबडतोबीचा बोजा कमी करता येईल व निर्यातवाढ पुरेशा प्रमाणात करून खऱ्या साधनसामग्रीची अदलाबदल न्याय्य प्रमाणात साधता येईल. या दृष्टीने पाश्चिमात्य देशांकडून इतर मार्गांपेक्षा आंतरराष्ट्रीय बँकेसारख्या संस्थेकडून कर्जे मिळविणे फायदेशीर होय.

परदेशी मदतीचा आपण वैत्तिक (Financial) विचार केला. परंतु या. मदतीद्वारे तांत्रिक कौशल्य व ज्ञानही मिळत असते. खरे पाहता, निर्यातवाढ होऊ लागली म्हणजे परदेशी चलनाचा

प्रश्न तीव्र राहात नाही, त्या अवस्थेत तांत्रिक ज्ञानाचा मुद्दाच महत्त्वाचा ठरतो.

परदेशी सहकार्याने उभ्या केल्या जाणाऱ्या उद्योगधंद्यांचे समर्थन, अनेकवेळा, त्यामुळे आपल्याला उच्च तांत्रिक ज्ञान प्राप्त होते, असे केले जाते. पण जरा बारकाईने निरीक्षण केले तर या समर्थनात फारसा अर्थ नाही असे दिसून येईल. परस्पर सहकार्याने भारतीय भांडवलदारवर्गाचा फायदा होत असला तर, तो देशाच्या समग्र अर्थरचनेचाच फायदा आहे, अशा समजुतीने भारत सरकारने बऱ्याच परदेशी सहकार्याच्या प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे; पण तसे मानणे चूक आहे. किंबहुना भारतीय तंत्रज्ञांच्या कल्पकशक्तीला व उपक्रमशीलतेला अशा सहकार्याने अनेक प्रसंगी नाउमेद केल्याचे आढळते.

खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील परदेशी सहकार्याने निघालेल्या प्रकल्पांमध्ये तांत्रिक ज्ञानाची संपूर्ण देवाणघेवाण होत नाही व भारतीय तंत्रज्ञांच्या तंत्रकुशलतेला अपेक्षेइतका वाव मिळत नाही, ही एक मोठीच समस्या निर्माण झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रात सहकार्याचे करार होत असताना याबाबतीत शक्य असूनही नीट स्पष्ट आग्रह धरला जात नाही. (उदा. बोकारो पोलाद कारखान्याबाबत असा आग्रह धरला असता तर समोरच्या पक्षाने तो समजून घेऊन त्या बाबतीत सहकार्यही केले असते.) त्यामुळे असा संशय येतो की ही गोष्ट अनवधानाने घडत नसून हेतुपुरःसर केली जात असावी. राज्यकर्त्यांपैकी काहींच्या मनात असे सोयिस्कर विचार दिसतात की, सार्वजनिक क्षेत्रात असा आग्रह धरण्याचे टाळले म्हणजे खाजगी क्षेत्रातील परदेशी भांडवल गुंतवणुकीच्या बाबतीत ही उणीव प्रकर्षाने राहिली तरी तिचे समर्थन करता येईल.

अशासारख्या प्रश्नांचा विचार करताना शेवटी असा मूलभूत प्रश्न निष्पन्न होतो की, पुढील दशकात भारतापुढील सर्वांत गंभीर समस्या आपण कोणती मानतो ? काही जणांची जणू खात्री पटलेली दिसते की, चीनच्या लष्करी शक्तीचा भारताला सर्वांत मोठा

धोका आहे; त्याला तोंड देण्यासाठी भारताला केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून राहता येणार नाही; आणि म्हणून आपल्या सर्व धोरणांतून आपल्या या मुलभूत परावलंबित्वाचे प्रतिबिंब उमटेल अशी खबरदारी घेतली पाहीजे. यातले गृहीतकृत्य खरे असले तर वरील निष्कर्षही योग्यच आहेत. हे समज मुख्यतः राजकीय स्वरूपाचे आहेत हे खरे. पण आपण भारताला भेडसावणाऱ्या आर्थिक प्रश्नांचा विचार करीत असलो तरी ह्या राजकीय प्रश्नांचा विचार टाळणे शक्य नाही.

माझ्या मते वरील दोन्ही गृहीतकृत्ये फारशी खरी नाहीत. त्या गृहीतकृत्यांच्या मर्यादा फार मोठ्या आहेत, व त्या लक्षात घेतल्या की निष्कर्षांतही मोठाच फरक पडतो. भारत-चीन सरहद्दीवर लष्करी चकमकी घडण्याची शक्यता नक्कीच आहे; आणि त्यासाठी आपण सुसज्जही असले पाहिजे. किंबहुना, सोव्हिएट युनियन आणि चीन यांच्या सतत सुरू असलेल्या वैचारिक झगड्यात, फार मोठ्या प्रमाणावर लष्करी झगडा टाळूनही, भारताच्या सरहद्दीवर सतत वाढता दबाव लष्कराद्वारा ठेवण्याचा प्रयत्न चीन करीलही. यामुळे वैचारिक झगड्यातील रशियाची भूमिका अधिकाधिक अडचणीत येईल व दुही पाडण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा चीनला होईल. परंतु भारतावर मोठे लष्करी आक्रमण करून ताबा मिळविण्याचा प्रयत्न चीन करणार नाही. कारण त्यातून जगातील सत्तातोल ढासळून एक जागतिक झगडाच निर्माण होईल. चीनला या भागात खास लष्करी किंवा इतर मोक्याचा फायदा नसताना चीन असा संघर्ष ओढवून घेईल हे मान्य करणे जड जाते. तसेच चीनच्या प्रत्यक्ष राष्ट्रीय हितसंबंधांना धोका असल्याशिवाय चीनने इतरत्र कोठेही प्रत्यक्ष व मोठ्या प्रमाणावर स्वतःला गुंतवून घ्यायचे नाही हे धोरण कटाक्षाने सांभाळलेले दिसते.

सीमेवर असणाऱ्या लष्करी संकटास तोंड देण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ व साधनसामुग्री उभारण्यास भारताची अर्थव्यवस्था

पुरेशी सामर्थ्यवान आहे. पण आपण बाहेरील मदतीवर विसंबून राहणे आवश्यक आहे असे मानणाऱ्यांना याची नीट जाणीव दिसत नाही. गेल्या दोन वर्षातील भरमसाट वाढत्या लष्करी खर्चानेही भारताच्या आयात निर्यातीत फार मोठी तूट निर्माण झाली नाही. यावरून एक गोष्ट निर्विवादपणे सिद्ध झाली आहे ती ही की, बरीचशी साधनसामग्री देशातल्या देशात उभी करण्याची आपली कुवत आहे, आणि परदेशी वस्तूंची वाढलेली गरज आपली निर्यातवाढ करून बऱ्याच अंशी भागवण्याची कुवतही आपल्या ठिकाणी आहे. अन्नधान्याच्याबाबत, साठ्याची व वितरणाची नीट योजना आखून पार पाडली असती तर सर्वसामान्य जनतेवर लष्करी खर्चातील वाढीने ज्या हालअपेष्टा लादल्या गेल्या त्यातल्या बऱ्याचशा टळल्या असत्या. सुदैवाने सर्वात कसोटीची वेळ आता टळलेली दिसते. संरक्षणखर्चाचा वाढता बोजा सहन करूनही अर्थव्यवस्था अधिक स्थिरतेसह प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करू लागलेली दिसते.

चीनच्या आव्हानाच्या अतिशयोक्त कल्पनेने गांगरून जाऊन भारताने आपली मूलभूत आर्थिक धोरणे व योजना बदलण्याचा धोका वस्तुतः अधिक गंभीर आहे. यामुळे आपण लष्करी मदत व आर्थिक विकास या दोन्ही बाबतीत परकीय मदतीवर विसंबून राहण्याची शक्यता वाढेल. असे झाल्यास मध्यंतरीच्या काळात अंतर्गत आर्थिक दडपणे अधिक प्रभावी ठरतील. वस्तुतः देशाच्या स्वातंत्र्याला व सुरक्षिततेला असणारा धोका हा जितका बाहेरून आहे तितकाच अंतर्गतही आहे आणि चीनने दिलेले आव्हान हे मूलतः राजकीय व आर्थिक आहे, निव्वळ लष्करी नाही. हे नीट समजून घेतले नाही तर तोच मोठा धोका ठरेल. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत जर देशातील दारिद्र्य व बेकारी झपाट्याने नाहीशी झाली तरच चीनच्या आव्हानास पुरेसे समर्थ उत्तर आपण देऊ शकू. आर्थिक व सामाजिक विषमतेमुळे धोका वाढतो आहे. तेव्हा ही विषमता विकासाच्या प्रक्रियेत नष्ट झाली पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्व
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 14936



चीनच्या धोक्यास तेच समर्पक उत्तर ठरेल.

आर्थिक प्रगतीचे उपलब्ध निर्देशांक लक्षात घेता, गेल्या दशकात चीनच्या विकासाचा वेग भारतापेक्षा अधिक होता असे दिसत नाही. सुरुवातीला निर्देशिल्याप्रमाणे चीनमधील अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढीचे प्रमाण भारतापेक्षा विशेष अधिक झालेले नाही; औद्योगिक क्षेत्रातील विकासाचा वेग तेथे कदाचित् अधिक असू शकेल. परंतु, सोव्हिएट युनियनबरोबरच्या वाढलेल्या झगड्याचा दुष्परिणाम म्हणून चीनची आर्थिक घडी विस्कळित झाल्यामुळे, आणि परदेशी हुंडणावळीच्या टंचाईच्या कारणाने उत्पादनोपयोगी मध्यम वस्तूंची आयात करता न आल्यामुळे, आतापर्यंत निर्माण झालेल्या औद्योगिक शक्तीपैकी बराचसा भाग पडून राहिला आहे. फक्त जड उद्योगधंदे, यंत्रोत्पादनाचे उद्योगधंदे व त्यांस आवश्यक असणारे तंत्रज्ञान याबाबतीत चीनने भारतापुढे आघाडी मारली आहे आणि यामुळेच आर्थिक व राजकीय क्षेत्रातील धोरण स्वतंत्र व सामर्थ्यशाली असल्याचे प्रदर्शन चीन करू शकत आहे. भारताने या आव्हानाचे स्वरूप नीट ओळखले तर अजूनही भारत चीनच्या बरोबरीने प्रगती करू शकेल; अजूनही वेळ निघून गेलेली नाही.

भारतातील खरा बिकट प्रश्न आहे विकासकार्यामुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या उत्पन्नाचे अधिक समान वितरण कसे करावे हा. याबाबतीत आतापर्यंतचा अनुभव फारसा उत्साहवर्धक नाही. उलट चीनने दाखवलेली या क्षेत्रातील प्रगती विशेष उल्लेखनीय आहे. भारतीय जनतेच्या दारिद्र्यावर पुरेसा आघात झालेला नाही असा जो सार्वत्रिक समज आहे त्याचे कारण, विकासाचा वेग मंद आहे ( तो पुरेसा गतिमान नाही हे खरे असले तरी ) हे नसून, उत्पन्न वितरणाचा पूर्वीचा साचा कायम राहिला आहे व त्यामुळे समाजातील कनिष्ठ वर्गीयांचा काहीच फायदा झालेला नाही, हे आहे. यावर उपाय भांडवलाची गुंतवणूक अधिक उपभोगाच्या वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगांकडे वळविणे हा मात्र

नव्हे ( काही लोक तसा सल्ला देताना आढळतात ). विकासाचा वेग तर आणखी वाढविला पाहिजे आणि वाढत्या उत्पादनामुळे निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांचा वाढता लाभ कनिष्ठ वर्गीयांना मिळवून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना केली पाहिजे.

उत्पन्न वितरणामध्ये अधिक समानता आणायची आणि विकासाचा वेगही वाढवायचा, या दोहोंचा मेळ कसा घालायचा हा एक प्रमुख प्रश्न आपल्यापुढे आहे. एक मार्ग म्हणजे सरकारच्या हाती येणाऱ्या करांच्या वाढत्या उत्पन्नातून मोफत शिक्षण, आरोग्य योजना, सामाजिक विमा योजना, इ. योजनांवर वाढता खर्च करून कनिष्ठ वर्गीयांना बसणारे जीवनकलहाचे चटके काही अंशी कमी केले पाहिजेत व त्यांना विकासाच्या नवीन संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. सध्याच्या कर-योजनेचे दर लक्षात घेता असे दिसते की, सरकारच्या हाती राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीपैकी सुमारे एक पंचमांश उत्पन्न हातात येते आणि, संरक्षण व कारभारयंत्रणा यावरील खर्च फार वाढविला नाही तर, वर सुचविलेल्या योजना कराचे दर न वाढविताही सहज पार पाडता येतील.

चीनच्या आक्रमणाने व चीनच्या अणुबाँबच्या प्रयोगामुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा व महत्त्व कमी झाले आहे, म्हणून भारतानेही आपली प्रतिष्ठा व मनोधैर्य वाढविण्यासाठी अणुबाँब बनवावा असे प्रतिपादन कांही मंडळी करताना आढळतात. त्यांच्या हे ध्यानात येत नाही की, अणुबाँबच्या प्रायोगिक स्फोटापेक्षा – ज्याची लष्करीदृष्ट्या फारशी किंमत नाही – चीनने दाखविलेला आत्मविश्वास व शिस्त आणि संपूर्णपणे स्वसामर्थ्यावर अवलंबून अल्पमुदतीत साधलेली प्रगती या सर्वांचा जगावर अधिक प्रभाव पडला आहे. याउलट भारतातील ढासळलेला आत्मविश्वास आणि परकीय मदतीवर विसंबून रहाण्याची वृत्ती यामुळे भारताची प्रतिष्ठा व सन्मान खालावत आहे.

परंतु, चीनच्या तुलनेने आपली आर्थिक क्षेत्रातील प्रगती समाधानकारक असल्यामुळे, आणि राहून गेलेल्या उणीवा पुढील

दशकात भरून काढणे शक्य असल्यामुळे, निराशावादी भूमिका घेण्याचे काही कारण नाही. चीनने निर्माण केलेल्या धोक्याचे महत्त्व कोणत्याही प्रकारे कमी न लेखताही भारताने खरी प्रगती करण्यावर भर दिला पाहिजे. त्यासाठी, शक्तीचे दिखाऊ प्रदर्शन करण्याचा मोह टाळून, स्थैर्य व शक्ती ज्यांवर अवलंबून आहे अशा मोक्याच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावयास हवे. भारताने उत्साहाने व आत्मविश्वासाने स्वसामर्थ्याच्या जोरावर या दिशेने आघाडी मारली व परदेशी मदतीवर फार अवलंबून न राहता उपलब्ध मदत योग्य कारणांसाठी वापरली, तर गेल्या काही वर्षांत जी प्रतिष्ठा धुळीस गेलेली आहे असे सर्वसाधारणपणे मानले जाते ती भारत निःसंशय परत मिळवू शकेल. किंबहुना इतर कोणत्याही मार्गाने गेल्यास विश्वास हरवत जाऊन अधिकाधिक आत्मघात होईल व देशाच्या राजकीय स्वातंत्र्याचा अस्त होईल.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५१३७
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वजन
अनुक्रम ४८३८५ वि:
क्रमांक १११३ नों: दि: ११/३/५७
REFBK-0015137

के. एन्. राज

# भारताची आर्थिक उन्नती

रुपयाचे अवमूल्यन झाल्यापासून गेल्या वीस वर्षांत भारताची आर्थिक क्षेत्रात अधोगती तर झाली नाही अशी कुशंका सर्वसामान्य माणसाला भेडसावीत आहे. डॉ. राज यांच्या व्याख्यानात त्यांनी गेल्या सतरा-अठरा वर्षांत भारताच्या शेती व उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातील कामगिरीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन वरील प्रश्नाचे नि:संदिग्ध उत्तर दिले आहे की, भारताची आजवरची कामगिरी आशावर्धक व इतर देशांशी तुल्यबल आहे. त्याच वेळी भविष्यातली चढण बिकट असून त्यासाठी पाळावयाची पथ्येही डॉ. राज यांनी सांगितली आहेत.

किंमत १.२० रुपये

समाज प्रबोधन संस्था, पुणे